वऱ्हाडसमाचार.

( तारीख ५ माहे मार्च सन १८७० )

## सूचना.

या आठवड्यांत एथें सरदार लोकांचे स्वाऱ्यामुळें फार गडबड होती त्यामुळें आम्हांस आपलें काम बरोबर करण्यास अवसर झाला नाहीं. व नोकरलोकांसही मौज पाहण्यास सुटया दिल्यानें वर्तमानपत्र हमेशा प्रमाणें निघालें नाहीं. तथापि मुख्य व कळण्यास अवश्य ते मजकूर आम्ही या एकस्ट्रामध्यें काढिले आहेत हें वाचकांस दिसून ते खपा होणार नाहींत असें इच्छितों. एडिटर व. स.

---

दिवाण साहेब व रेसिडेन्ट साहेबांच्या स्वाऱ्या उदईक दोन वाजतां जबलपुराकडे जाणार आहेत.

---

## लार्ड मेयो साहेबांचें अकोल्यास आगमन.

हिंदुस्थानचे व्हाइसराय व गवरनरजनरल लार्ड मेयो खामगावची आगगाडी सुरू करण्यास जाण्याचे वेळीं अकोल्यास येणार, येणारनाहींत, आलेतर चारच मिनिटें थांबणार, अशा परोपरीच्या बातम्या होत्या व त्यांवरून त्यांचे पाय आमचे अकोल्याचे भूमीस लागतात किंवा नाहीं व त्यांचें मुखकमल लोकांस दिसून ते धन्य होतात किंवा नाहीं याविषयीं वानवा होता त्याचा निकाल होऊन लार्डसाहेब अकोल्यास आले व एक दिवस राहून आणि आनंद भोगून पुढें गेले.

गुरूवारीं तिसरे प्रहरीं सवातीन वाजत स्पेशियल आगगाडींतून लार्डसाहेबांची स्वारी अकोल्यास आली. ते येणार म्हणून स्टेशनावर चांगली शोभा केली होती. जागोजाग रंगीबेरंगी निशाणें लाविलीं होतीं. स्टेशनाचे दरवाज्यास रंग देऊन, निशाणें लावून, व सुरूचे खांबासारखी झाडें लावून, व मोठाल्या अक्षरांनीं अर्ल मेयो यांस शुभसूचक अशीं इंग्लिश वाक्यें जागोजाग लिहून मोठी शोभा केली होती. तोफखाना, घोडेस्वार, व ब्यांडवाजा सज्ज केला होता. रेलवेवर फागसिग्नल म्हणून एक प्रकारचे दारूचे डबे ठेवतात व त्यांवरून ट्रेन आली म्हणजे लार्डसाहेबांचे सन्मानार्थ तोफांसारखे आवाज होतात तसे २१ फागसिग्नल रेलवेकडील अधिकाऱ्यांनीं ठेविले होते. व गाडी येतांच त्यांचे तितके आवाज झाले व सरकारी तोफखान्यांतूनही २१ तोफांची सलामी झाली आणि ब्यांडवाजा वाजूं लागला. गाडींतून उतरतांच सर्व युरोपियन लोकांच्या भेटी झाल्या. दिवाणसाहेब व रेसिडेंटसाहेब तर त्यांस वडनेऱ्यापर्यंत सामोरे गेले होते. नंतर सर्व परत आल्यावर कमिशनर कचेरीची जागा लार्डसाहेबांस राहण्यास योजिली होती तेथें गेले. संध्याकाळीं गावांत व छावणींत सर्वत्र दिवे लावून मोठी शोभा केली होती. व ती पाहण्यास सर्व गाव लोटला होता. याच रात्रीं रेसिडेंट साहेबांकडून त्यांस मेजवानी झाली. सकाळीं दहा वाजतां साहेबलोकांच्या व अकरा वाजतां थोड्या नेटिव आफिसर लोकांच्या भेटी झाल्या. नंतर दोन वाजतां स्पेशियल ट्रेनमधून खामगावाकडे गेले. जातेवेळींही आल्या वेळच्या प्रमाणें २१ तोफांची सलामी व ब्यांडवाजा वगैरेचा थाट झाला. आणि खामगावाहूनही रात्रीचे साडेसात वाजतां जबलपुराकडे जाण्याकरितां ते निघून गेले. व दिवाणसाहेब, रेसिडेंटसाहेब, आणि इतर वऱ्हाडचे अधिकारी रात्रीं साडे अकरा वाजतां अकोल्यास परत आले.

---

## अकोल्याचे दरबार.

मुंबई पुणे वगैरे राजधानीचीं शहरें आहेत तेथें हमेशा राजे रजवाडे व सरदार लोक येतात व त्यांकरितां तेथें दरबार भरतात हें आमचे वाचकांस ठाऊक आहेच. त्याप्रमाणें आमचे वऱ्हाडप्रांतीं निजाम सरकारचे दिवाण साहेब व रेसिडेंट साहेब यांच्या स्वाऱ्या आल्या ह्मणून एथेंही या आठवड्यांत दोन दरबार भरले. प्रथम मंगळवारीं चार वाजतां कमिशनर आफिसाचे बंगल्यांत रेसिडेंट साहेबांचा दरबार भरला. त्यांत वऱ्हाडांतील बहुतेक युरोपियन लोक होते व कांहीं जमीदार आणि सरकारी नेटिव कामदार होते. रेसिडेंट साहेब सर्वांचे मागून आले. ते येतांच कित्येक जिल्ह्यांचे डिपुटी कमीशनरांनीं प्रांतांतील जमीदार लोकांस त्यांचे पुढें नेऊन भेटविलें. रेसिडेंट साहेब त्यांतून एकाद्याशीं एकादा शब्द बोलले. मग लष्करी व पोलिस अधिकाऱ्यांनीं आपले बाहादुरीचे लोक भेटविले व शेटीं विद्याखात्याचे डायरेक्टर साहेबांनीं आपले खात्यांतील लोक भेटविले नंतर रेसिडेंट साहेब उठून गेले व दरबार खलास झाले.

दुसरा दरबार दिवाण साहेबांचे डेऱ्यांत बुधवारीं दिवसां बारा वाजतां झाला. त्यांनीं प्रथम दुसऱ्या एका तंबूंत लोक बसवून ठेविले व थोडथोडे भेटीस आणविले आणि सगळे लोक दरबार तंबूंत येऊन खुर्च्यांवर च्यार दोन मिनिटें बसल्यावर दरबार खलास झालें. या दरबारांत पाच च्यार साहेब लोक पाच पंचवीस जमीदार व थोडे पाटील होते.

याप्रमाणें दोन्ही दरबारचा थाट उडाला संभाषण, सूचना किंवा बोध दोन्ही सरदारांकडून कांहीं झालें नाहीं, पानसुपारी अत्तर गुलाब, फुलें वगैरे दोन्ही दरबारांत दिलीं नाहींत. रेसिडेंट साहेबांचे दरबार प्रसंगीं तर अत्तर गुलाब फुलें वगैरे सामानाचीं तबकें भरून तयार असलेलीं परत गलीं पण त्यांतून कोणास कांहीं द्यावें असें व्यवस्थापकांस वाटलें नाहीं असें दिसतें.

या सरदार लोकांच्या स्वाऱ्या आठवडाभर एथें आहेत आणि त्यापासून इकडील प्रांतस्थ लोकांच्या मनावर काय ठसा उठला असेल याचा विचार केला पाहिजे. आम्हांस वाटतें कीं नेटिव लोकांची कांहीं सुव्यवस्था राखावी असें काम कोणाकडे दिलें नव्हतें. व कदाचित दिलें असल्यास त्यानें तें चांगलें बजाविलें नाहीं. स्टेशनावर, दरबाऱ्याच्या जागेवर, चिरागदानाचे प्रसंगीं, वगैरे नेटिवांचा जो पाणउतारा झाला व त्यांस पोलिसाचेवगैरे जे धक्के व रपाटे खावे लागले त्यावरून प्रांतस्थ लोकांस असें वाटलें कीं आमचे फार दुर्दैव व फारा दिवसांनीं आलेले वरिष्ठ सरकार आमच्या नियाच्या सरकारा प्रमाणेंच आम्हांस कांहीं पुसत नाहीं. व पुसत नाहीं इतकेच नव्हे पण गावोगावींहून आम्हांस खर्च वेच करवून सजवून आणून निराश व उत्साहशून्य करित होत्सातें पोलिसाच्या ताबडींत देतें हें फार आश्चर्य आहे. खरेंच वऱ्हाडांत युरोपियन लोकांचा नेटिवांविषयीं चांगला ग्रह नाहीं असें दिसून आम्हांस वाईट वाटतें. व सर्व एकच शाळा कशी याबद्दलही कांहीं कळत नाहीं. खामगावची रेलवे सुरू केली त्या दिवशीं तीन स्पेशियल ट्रेनी गेल्या, त्यांतून शेसवाशें युरोपियन नेले परंतु गावांतील पांचचार देखील प्रतिष्ठित व सभ्य गृहस्थांस किंवा बाहेरून आणिलेल्या थोर थोर नेटिव कामदारांपैकीं कोणास बोलाविलें नाहीं. तशींच नेटिवांचीं कामें पुस्तकालय, मुलींच्या शाळा, मुलांच्या शाळा वगैरे, हे थोर थोर अधिकारी गावांत आले असतां व त्यांच्या पुढून गेले असताही वाहनांवरून उतरून आंत जाऊन त्यांनीं त्या पाहिल्या नाहींत. याबद्दल तर लोकांस फारच आश्चर्य वाटलें. वऱ्हाडचे मुख्याधिकारी रेसिडेंट साहेब व दिवाण साहेब आज आठ दिवस अकोल्यास येऊन राहिले आहेत पण इतक्या मुदतींत त्यांनीं एकाही शाळेंत जाऊन दोन घटिका घालविल्या नाहींत. रेसिडेंटसाहेबांच्या मडमसाहेबांनीं मुलीं करितां चांदीचीं पदकें केलीं त्यांतील कांहीं एथें देण्याचा समारंभ रेसिडेंटसाहेबांसमक्ष करविण्याचा डायरेक्टर साहेबांचा हेतु होता असें आम्ही ऐकिलें होतें पण तसें करण्यास रेसिडेंटसाहेबांस फुरसद झाली नाहीं, त्यांनीं निवांतपणें जाहागिरदार, जमीदार वगैरे लोकांच्या भेटी घेऊन त्यांचें सुखदुःख ऐकिलें नाहीं, त्यांस उत्तेजनपर कांहीं बुद्धिवाद सांगितला नाहीं, उमरावती, इलिचपुर वगैरें मोठालीं शहरें एकेक दिवसाचे रस्त्यावर असतां पाहिलीं नाहींत, देशाचा देखावा व लोकांची स्थिती कांहीं मनात आणिली नाहीं, सर्व प्रांतातील युरोपियन लोक एकत्र जमले. आठ दिवस आनंदांत राहिले. खाणें, पिणें, गाणें, नाचणें, वगैरे सुखोपभोग त्यांनीं यथेच्छ घेतला, व हजारों रुपये खर्च केले. पण या प्रांत चे नेटिवांस त्यापासून काय लाभ झाला म्हणाल तर सदरीं लिहिलाच आहे. आतां आज हें लिहित असतां मागें पेशवाईची अखेर होऊन अवल इंग्रजी सुरू झाली तेव्हां दक्षिणेंत जी स्थिती झाली होती व तीवरून सर जान मालकम साहेबानीं ज्या सूचना केल्या व ज्या मे॰ चाप्लिन साहेबांनीं सन १८२३ सालीं सरकुलर हुकुमानें सर्व दक्षिणेंत प्रसिध्ध केल्या त्यांची आम्हांस आठवण झाली. व त्या फारच चांगल्या आहेत सबब एथें घेतों.

नेटिवांतील मोठया प्रतीचे बडे लोक व सरदारलोक यांचे ठायीं जर कामदार योग्य लक्ष पुरवितील तर सरकारास फार आनंद होईल. व दक्षिणेंतील कामदारांस कोणी योग्य सूचना करील तर फार चांगलें होईल. अशी सरकारची इच्छा प्रदर्शीत झाल्यावरून हे खालील विचार लिहिले आहेत.

विलायतेहून तरुण कामदार हिंदुस्थानांत येतात त्यांस चांगला अनुभव नसल्यानें ते आपलेच ठायीं आपल्यास मोठे मानून नेटिवांस तुच्छ मानितात. ही त्यांमध्यें मोठी चूक आहे. व तिजमुळें मनुष्य गर्विष्ठ आणि मग्रुरी स्वभावाचा होऊन सर्व प्रतीच्या लोकांस त्रासकारक व सरकारी कामास उपद्रवी असा होतो. त्या सर्वांचें कारण त्यांस सर्व प्रकारच्या लोकांचा सहवास कमी हेंच दिसतें. तथापि चांगले शिकलेले तरुण लोक या देशांत आले आहेत त्यांचे अनुभवास लवकरच असें येईल कीं चांगले हुशार नेटिव लोकांचे मदतीवाचून आपलीं मोठीं महत्वाचीं जीं जीं कामें तीं आपणास कांहींच करितां येणार नाहींत. आणखी त्यांस असेंही आढळलें कीं आपल्यामधील जे जे पुरुष ह्या देशांत विख्यात झालेले आहेत त्यांचा त्यांचा नेटिवांशीं फार सहवास होता. व नेटिवांपासून ते लोक अनेक प्रकारची माहिती व अभिप्राय घेऊन नंतर विचारपूर्वक योग्यायोग्य पाहून आपले कामांत त्यांचा संग्रह करीत असत. तेणें करून त्यांसही मोठी मदत होत होती.

दुसरें असें कीं ज्या देशाचें मुळचें राज्य बदलून नुकतेंच नवें झालें आहे. तेथील थोर पदवीचे लोकांशीं चांगलें दळणवळण ठेवून वागणें हें युरोपियन लोकांस आपले संरक्षणाकरितांही अधिक उपयोगाचें आहे. आणि अशा गोष्टीगुलाबीपासून सर्वांचें फार हित आहे. नेटिवांच्या वर्तणुकी व चालीरीती यांचे आपण आधीं चांगलें ज्ञान करून घ्यावें. व मग त्यांचा उपयोग करून घ्यावा. तशीच चांगली लोकप्रीति संपादावी. तिजपासून सरकारास फार फायदा आहे. दुसरें असें कीं नेटिवांशीं आपण सलगीनें वागलों म्हणजे तेही आपल्या राज्य कारभाराच्या चाली व इतर रितीभाती पाहतील. आणि शास्त्रीय व इतर उत्तम प्रकारच्या ज्ञानाच्या व सुधारणेच्या प्राबल्यानें आपणास काय फळ झालें आहे तें पाहून त्याविषयीं चांगला विचार करतील. व तेव्हां आपली स्वतांचीही चांगली सुधारणा व्हावी असें तें इच्छितील. तेणेंकरूनही सरकारचा बहुत फायदा आहे. माजी कामिशनर साहेबांनींही याबाबें पुष्कळ शिफारस केली होती पण कामदारांचें तिजकडे फारसें लक्ष वळलें असें दिसत नाहीं. जेव्हां जिल्ह्यांतून सरकिटास जावयाचें तेव्हां जेथें जेथें सरदारलोक व दुसरे भलेलोक भेटीस येतील तेथें तेथें आगत्यपूर्वक त्यांच्या भेटी घेत जाव्या. व त्यांच्या मरातबा राखीत जाव्या. आणि पूर्वींचे राज्यापासून तुम्हांस जो मान व पदवी आहे तिकडे आमचें चांगलें लक्ष राहील असें सांगून त्यांस वारंवार उत्तेजन देत असावें. हें करणें फार मोठें आहे असें नरी नाही तरीं तसें केलें नाहीं, म्हणजे त्यांच्या भेटी वगैरे घेतल्या नाहींत व त्यांशीं आदरपूर्वक भाषण केलें नाहीं; तर त्यांस ती मोठी मानहानी व नाखुषी वाटते. व त्यांच्या व इतर लोकांच्या दृष्टीनें ती मोठी फजीतीच होय असें मानिलें आहे. असले उपच्यार व असली अदबी यांत वास्तवीक रितीनें आपणास कांहींच महत्व दिसत नाहीं तरि नेटिवांचे मनावर त्यांचा पराकाष्ठेचा जोर आहे. व त्यांच्यात्या पूर्वापार चालत आलेल्या पोकळ खटपटींत थोडें चुकलें म्हणजे देखील कित्येक प्रसंगीं वाईट व भयंकर परिणाम होतात हें लक्षांत ठेविलें पाहिजे. मागील इतिहास आपण पाहवे म्हणजे किती क्षुल्लक कारणानें केवढालीं बंडे वगैरे झालेलीं आ

तीं दृष्टीस पडतील.—जोंपर्यंत लोकांचीं मनें आपणास आकळलीं गेलीं नाहींत तों पर्यंत आपण राजप्रतिनिधीनीं आपली वर्तणूक अशी ठेवावी कीं लोकांच्या समजुती व चाली मग त्या धर्मसंबंधी अगर नीतिसंबंधी कोणत्याही असोत त्या आपणास नाकबूल नाहींत असें लक्षांत ठेवून आपण वागलें पाहिजे. आपण परदेशीय लोक व ते जिंकून पराजित झाले. ले लोक यांच्या संबंधाचा जेव्हां आपण विचारकरूं तेव्हां हें जें आपण कबूल करितों तें अवश्य आहे असें आपणास दिसेल. आणि असें मनांत आणिलें कीं आपण परकी सरकार जे अर्ध्या पृथ्वीच्या पलीकडून येऊन ह्यांवर राज्य करितों आणि त्यांच्याशीं गोडी गुलाबीनें वागत नाहीं, तर मग आपला पराक्रम, आपला न्याय, आपला नेमस्तपणा इत्यादि जे आपल्या राज्य कारभाराचे मुख्य गुण यांचा थोरपणा ह्यांनीं कसा वाखाणावा? व आपले हेतु आणि स्वभाव त्यांचे कसे दृष्टोत्पत्तीस यावे? याजकरितां प्रत्येक मनुष्यानें या गोष्टी लक्षांत ठेवून तो स्नेहसंबंध दृढ केला पाहिजे, कीं जेणेंकरून जिंकले गेलेले व जिंकणारे एकचित्त राहतील. हा एक विचार आहे कीं जिंकलेल्या लोकांस त्यांचे शास्त्र व त्यांच्या चालीरिती जशा असतील तसेंच त्यांस वागूं द्यावें, तेणेंकरूनच आपण त्यांचा विश्वास व रहस्य संपादन करून हा फाकट पसारा जें हिंदुस्थानचें राज्य याचा आपण जुना बसवू अशी आशा आहे. आणखी आमची अशी खात्री आहे कीं नेटीव सरदार लोकांशीं वागण्याच्या ज्या पध्धती त्यांविरुध्ध आपण वागूं लागलों तर आपणास बऱ्याच अडचणी व धोके येतील आणि जर आपण आपले मनांतील पीळ कांहीं अंशीं ढिला केला तर व यांच्याशीं मेळ ठेवून वर्तलों तर त्यापासून पूर्ण फळ जरी प्राप्त झालें नाहीं तरी त्याचा परिणाम चांगलाच होईल. नेटीव लोकांच्या सवयीनें दृढ झालेल्या ज्या मानमरातबा व अदबी त्यांस त्यांच्या योग्यतेहून आपण अधिक मान देऊन त्या राखण्यास जपावें ही एक अर्थी चुकी जरी आहे तरी आपल्या गर्विष्ठपणाच्या चुकीपेक्षां निर्भय तेकडे वळणारी ती अधिक आहे म्हणून आपण तीच ग्रहण केली पाहिजे. अशा करण्यानें आपण आपल्या पध्धतीचें वैभव कांहीं कमी केलें असें होत नाहीं असें आम्ही म्हणतों. आणखी आपण असें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं नेटीव लोकांचें राज्य गेल्यापासून त्यांचें वैभव कमी झालें आहे याकरितां त्यांची आपण हम्मेश चांगली अदबी ठेवून गौरव करीत जावा व सभ्यपणानें त्यांशीं वागत जावें. आपल्या विचारानें आपणास नेटीव लोक आपणाहून जरी फार हलके असे दिसत असले तरी तशाच बुध्धीनें जर आपण त्यांशीं वागूं तर तें आपलें करणें फार उपद्रव कारक व दुष्ट असें होईल आणिहि जे सदरील विचार सांगितले त्यांची बुध्धीपूर्वक हयगय केली असें होईल. आतां हेंही खरें आहे कीं तिरस्कारबुद्धीस उत्तेजक असेही कधीं कधीं प्रसंग प्राप्त होतात. तरी जर मुख्य हेतूकडे बळकट लक्ष दिलें तर प्रत्येक मनुष्यास आपल्या स्वभावाच्या शक्तीवर दाब ठेवणें हें स्वाधीन नाहीं असें नाहीं- सर्व प्रकारच्या लोकांशीं संबंध ठेवितांनां एक शांत वृत्ती आपलें जसें काम करील तसें दुसरी कोणतीही मनाची स्थिती करणार नाहीं हें मनांत ठेवून वागणें हें आपलें मुख्य कर्तव्य कर्मांपैकीं काम आहे असें समजून या सूचनेंवर लक्ष ठेवावें.

## खामगावच्या रेलवेची शुरुवात.

काल म्हणजे तारीख ४ माहे मार्च सन १८७० इसवी रोजीं जलम पासून खामगावा पर्यंतची रेलवे शुरू झाली. त्या समारंभाकरितां कलकत्याहून मुद्दाम गवरनर जनरल लार्डमेयो साहेब आले होते. ते अकोल्याहून काल दोन प्रहरीं दीड वाजतां स्पेशियल ट्रेन काढून दिवाण साहेब सर सालरजंग, व रेसिडेंट साहेब, कमिशनर साहेब इत्यादि मंडळी सहित गेले होते. व त्या पूर्वीही काल दोन स्पेशियल ट्रेनी खामगावच समारंभा करितां गेल्या होत्या सुमारें च्यार वाजतां खामगावास आगगाडी पोंचली. तेथें स्टेशन तयार नसल्या मुळें तूर्तातूर्त लाकडी प्लयाटफार्म केला होता त्याजवर ही मंडळी उतरली. तेथें जमीन सुंदर कापडानें मढविली होती, व ठंड केले होते, कमानी केल्या होत्या. कोटाचे कचेरीपर्यंत दोहों बाजूनें रोशनाईची तयारी केली होती, दोहो बाजूनें घोडेस्वार उभे होते, बाजूस पायदळ होते मध्यें ब्याडबाजा व टेकडीवर तोफखाना होता. आगगाडींतून स्वाऱ्या उतरतांच गव. जन. साहेबांकरितां २१, दिवाण साहेबांकरितां १७, व रेसि. सा. करितां १३ तोफांची सलामी झाली. नंतर गवरनर जनरल साहेब प्लयाटफार्मच्या पलिकडे चालत जाऊन त्यानीं हातांत हातोडा घेतला व एक बाजूचा रेलाचा सांधा जोडण्या करितां त्यांमध्यें त्याची किल्ली ठोकून बसविली व तो पक्का केला आणि हा आगगाडीचा मार्ग आजपासून सर्व लोकांकरितां खुला झाला असें सांगितलें. तेव्हां सर्वांनीं आनंदानें टाळ्या पिटल्या व तोफांची सलामी झाली. नंतर कचेरीपाशीं तंबू दिले होते तेथें उपहाराकरितां गेले. तें कृत्य झाल्यावर कचेरींत मुनसिपल कमिटीनें लार्ड मेयो साहेबांस मानपत्र दिलें. नंतर मार्केट, कापसाच्या फयाकटरी वगैरे पाहावयास गेले यावेळेस सर्व गावभर रोशनाई फार चांगली केली होती तो पाहून आल्यावर मेजवानीचा थाट झाला. व त्या प्रसंगीं गवरनरजनरल साहेबानीं दीडतास उभेराहून सुंदर भाषण केलें तोमजकूर इंग्लिश व मराठी पुढील खेपेस मराठींत लिहूं. लार्ड साहेबांचें भाषण झाल्यावर सर सालर जंग साहेबांनीं उठून हिंदुस्थानींत थोडें भाषण केलें व त्यांचे आभार मानिले. नंतर सर्व समारंभ आटोपल्या व साडे सात वाजतां लार्ड मेयो साहेब आगगाडींत बसून जबलपुराकडे चालते झाले. व त्यांचे सन्मानार्थं पुन्हा तोफा झाल्या व दीवाण साहेब आणि रेसिडेंट साहेब प्रभृती मंडळी नऊ वाजतां तेथुन निघुन बारावाजतां आकोल्यास परत आली.

अकोला—जबलपुराच्या रेलवेच्या सुरवातीच्या समारंभा करितां एथील कमिशनर व वऱ्हाड तील बहुतेक डिपुटी कमिशनर तसेच आसि० कमिशनर वगैरे साहेब लोक उदईक जाणार आहेत.

## ARRIVAL AND DEPARTURE OF HIS EXCELLENCY THE VICEROY AND GOVERNOR GENERAL OF INDIA.

The last week has passed over us like a storm. It was full of all sorts of noise. Music and salutes filled the place of thunder and lightening. Feasts and banquets were showered upon the European residents and guests. Every where there was joy, mirth and festivity. Anxieties there were none except the pleasing ones of entertaining a noble guest, paying a visit to a grandee or of procuring a supply for a rich fete. The camp was everywhere set off by numerous small as well as big, plain as well as kinkap tents, the former being occupied by European gentlemen, and the later by Sir Salar jung and his people. The arrival of Sir Salar jung and the Resident of Hyderabad we have announced in our last issue, and it now remains to be noticed what they have been doing at Akola during the last week. From the time they entered their respective tents very few things that would catch the public eye have been done. It is our business however, to record their movements. If the rumours in the town are correcct we are told that the Resident and Sir Salar jung were for the first three full days engaged in corresponding with the Viceroy by means of telegrapic messages, and in concocting the plans of the Viceroy's reception and accomodation at Akola. The plans changed as the winds changed. His Excellency the Viceroy is also reported to have changed his plan and programme once or twice and consequently there were alternations of agitation and suspense, zeal and disappointment, with regard to the advent of the Viceroy. On the fourth day, Tuesday, the 1st of March, the Resident designed a durbar for perhaps the Vuttundars and Jehagirdars of Berar. The old as well the young holders of Jahagirs and Vuttuns, the Patels, patvarees Pandyas and Deshpandyas, of west Berar especially were all invited and respectfully admitted into the durbar. The European officers in Berar as well as guests were all present; but the native officials generally were either studiously or by an oversight not required to attend. We ourselves also had not the good fortune of being present on the occasion. There was very ceremoniousness at the darbar except Pan and utter the absence of which would have been considered a sign of disrespect at a durbar held in the Deccan or elsewhere. On the next day, Wednesday, a similar durbar was held at Sir Salar Jung's tent which, we are told, was a little more gratifying than the former. Sir Salar Jung the Nizam's prime minister and at present the defacto Nizam refused to receive nazaranas from Jehagerdars that were lately his own loyal subjects,. This event is every where considered to be an index of very high moderation and reformed principles. On the fifth day His Excellency the Viceroy was expected and there was extreme animation in the town and cantonement. Every where there was khutput and liveliness in matters of cleanliness and illumination. The energetic Commissioners and assistant Com missioners did their best in making the Commissioner's kutcherri where the Viceroy was to lodge, appear neat and beautiful. Sir Salar Jung expended a lot of money on the illuminating the skirts of the kutcherri ground and the whole place was quite in a blaze. The eclat and etiquette at the reception of the Viceroy were also noble and splendid. Sir Salar Jung, the Resident having gone as far as Budnaira to receives the Viceroy a few other grandees were arrayed on the station plat from. The whole town and peit had turned out to receive the Viceroy, and his arrival was anounced by a salute of 21 guns. The Viceroy, the Resident, Sir Salar Jung, and Mr. Morris the Chief Commissioner of the Central Provinces drove in a carriage and four to the Viceroy's temporary residence and half the night was spent at a dinner very rich and splendid of its kind, not on account of its own quality but on acount of the noble guests. The next morning there was a levy for the European and natives. Very few natives were presented, and the Viceroy and the Governor General left this place for Khamgaum. During all this time there was mirth and joy indeed; but as Sir Sarlar Jung there is one thing very better. His Excellency we are told, very earnestly hoped to entertain the Viceroy once at his own expense; but the Viceroy having directly proceeded from Khamgaum to Bhosawal *enrout* to Jubbulpore, Sir Salar Jung must have been disappointed. We think the Viceroy ought to have been generous enough to accept a request of Sir Salar jung who has been the most loyal adherent of the British during and since the mutinies. As regards Sir Salar jung and the Resident we have only to remark that it was illeberal of them not to have seen the schools in Akola. Schools are the only institutions which should be fostered with utmost care and attention by any Govern ment. All other institutions must get on through need politic, but schools must be cherished by frequent visits and repeated encouragements held out to their conducters If high Government authorities and noblemen are not so kind as to visit them once they will soon discouraged and disregarded. There are not many schools in Akola and it is extremely unfortunate for them that the Resident and Sir Salar jung could not eke out a few minutes leisure to visit them during a stay of eight days.

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छा. प्र. केलें

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL V AKOLA :—SATURDAY EVENING, MARCH 12 1870 NO. 11

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख १२ माहे मार्च सन १८७० इ० अंक ११


## पाहण्यास योग्य मुंबई शहर.

या आठवड्यांत मुंबई शहरास केवळ इंद्रभुवनाचीच शोभा आली असेल असें म्हणण्यांत थोडीच अतिशयोक्ती पडेल. मुळचेंच धनकनकसंपन्न मुंबई शहर. त्यांतून महाराणी साहेबांच्या प्रिय पुत्राचें तेथें आगमन, व त्यांत त्यांच्या भेटी करितां बडोद्याचे गायकवाड, कोलापुरचे राजे, कच्छचे राव, जुनागडचे नबाब इत्यादि दक्षिणेंतील, गुजराथेंतील, व काठेवाडांतील बहुतेक राजे लोकांचें मुंबईस जाणें, व मोठ्या उत्साहबुद्धीनें सर्व लोकांनीं केलेला शहराचा शृंगार, आणि ग्यासलाईटची अनुपम शोभा व विलायती तऱ्हेचें चित्रविचित्र दारूकाम हीं सर्व एकसमयावच्छेदें आजच्या दिवसांत मुंबई शहरांत होत आहेत तेव्हां तिचें सौंदर्य काय वर्णन करावें? ज्यांस ज्यांस अनुकूल व सोय म्हणून असेल त्यानें त्यानें दोनशें कोस दूर मुंबई असली तरी ती आज पाहून डोळ्यांचें पारणें फेडून घ्यावें, अशीच ती अनुपम शोभा आहे व कदाचित साऱ्या जन्मांतही आपणास बाहेर प्रांतींच्या लोकांस अन्यत्र तशी दिसणार नाहीं.

काल प्रातःकालीं राजपुत्र ड्यूक आफ एडिंबरो हे तेथें जाऊन पोंचले. व आज रात्रीं त्यांच्या उत्साहार्थ शहरांत रोशनायी करणार आहेत तिज विषयींची कल्पना प्रत्यक्ष डोळ्यानें पाहण्याच्या समाधाना पेक्षां लेखानें किती होणार आहे? कांहींच नाहीं; तथापि अंशतः तरी त्याची माहिती आमचे प्रिय वाचकांस व्हावी म्हणून हा खालील थोडा मजकूर मुंबईच्या नेटिवओपिनियन पत्रावरून आम्ही एथें घेतों.

तयारी चालली आहे तिची हकीकत अशी:— कोटा पासून तो परळ पर्यंत सर्व शहराभर दिवे व आराष होणार आहे परंतु पांच सात ठिकाणीं फारच मौज होणार आहे. मानिशाळे समोर जेथें कांपाच्या मैदानास आरंभ होतो, तेथें सर्वांत उत्कृष्ठ रोषनाई होणार आहे. तेथें हाल्लीच लांकडाच्या साहा फार उंच व भव्य अशा जय प्रदर्शक कमानी साहा रस्त्यांच्या नाकयावर उभारल्या आहेत व त्यांच्या दोहो बाजूस लाकडाचेच मनोरे केले आहेत. तसेंच मनीशाळे समोरच्या उंच दिव्याच्या खांबाच्या चारीबाजूस चार मोठे व उंच लाकडाचेच विजयस्तंभ उभे केले आहेत. या सर्वांवर हजारों दिवे लावून मध्य भागीं पारदर्शक कापडाचा पडदा व त्याजवर सुंदर लढाईची चित्रें काढलेलीं असा ठेविला जाईल व त्या नजीक पलटणचे लोक हत्यारबंद उभे केले जातील. मानीशाळेबाहेरही सदरहु प्रमाणेच एक पडदा लावला जाईल व या शाळेच्या सर्व बाजूनें वर व खालीं धुराच्या दिव्यांच्या ज्योती फुलांच्या माळा प्रमाणें लावल्या जातील.

मानिशाळें पासून तो कोटापर्यंत मधील कांपाच्या मैदानांत लाकडांचे मोठालें स्तंभ ठिकठिकाणीं असे ३००मांडले जातील व त्या प्रत्येकावर दीड दीडशें धुराच्या दिव्यांच्या ज्योती लावल्या जातील. टौनहाला समोरून जो रस्ता कोटा बाहेर येतो तेथें जें सुंदर कारंजें आहे त्यास "फ्रियर फौंटन" ह्मणतात; तेथेंही फार चांगली आराष होणार आहे. या कारंज्याच्या सभोवतीं सर्वभर धुराच्या दिव्यांच्या ज्योती मधून मधून दिव्यांचे चांद, व कोपऱ्यांवर दिव्यांचे गोल वगैरे असे लावले जातील. कारंज्याचें पाणी उडतच राहील व त्याच्या बाजूच्या खांबांच्या मध्य भागीं तरतऱ्हेच्या रंगाच दिवे टेवले जातील यांच्या योगानें ते ते रंग पाण्यावर परावर्तन पावून अपूर्व शोभा दिसेल. रस्त्याच्या नाकयावर एक भव्य लाकडाची कमान उभारली आहे तिच्यावर "ग्यालेशिया" नामक अप्सरेची सोळा फुट उंचीची तसबीर पारदर्शक कापडावर काढलेली ठेविली जाईल. बाजूस दुसरीं दोन भव्य चित्रें व खालीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातीच्या लोकांचीं अनेक चित्रें लावलीं जातील. या कारंजापासून तों पुढें नीट समुद्रा पर्यंत जो रस्ता जातो त्या वर दोही बाजूंनें दिवेच दिवे दिसतील. किटांच्या आंत टौनहाल व त्या पुढील "एलफिन्स्टन सर्कल" एथेंही मोठी रोषनाई होणार. टौन हाला समोरील वाटोळी जागा दुरस्त करून तिच्या सभोवती लोखंडी जाळीचा कडठा लावला आहे. आंत झाडें लावण्यास जागा तयार केल्या आहेत, व मध्य भागीं सुंदर कारंजें उभारलें आहे. सदरहू कठड्यावर सर्वभर धुराच्या दिव्याचा ज्योती व प्रत्येक उभ्या गजावर दिव्यांचा चांद वदुसर सुशोभित दिव्यांचे प्रकार दाखविले जातील. टौन हालाच्या सर्व बाजूस दिव्यांच्या हारी लावतील व पुढल्या बाजूस तरतऱ्हेची पारदर्शक कापडावर काढलेलीं मोठ मोठालीं चित्रें लावलीं जातील. टौन हालाच्या वर मध्य भागीं ब्रिटन देश हीच कोणी स्त्री अशा भावानें तीची तसबीर व तिच्या दोहीं बाजूस इंग्रजांच्या राज्याच्या योगानें हिंदुस्थानास जे फायद झाले त्यांचे रूपदर्शक अशीं दुसरीं पुरुष व स्त्रियांचीं चित्रें लावलीं जातील. टाऊन हालाचे मधले खांबांच्या सभोंवतीं मळसुत्राच्या दोरी प्रमाणें दिव्यांच्या ज्योती लावल्या जातील; व बाजूच्या दोन्ही खांबावर ज्योती उभ्या सरळ रेघेंत असलील "आलेफड" हीं अक्षरें मोठ मोठालीं दिव्यांचीं दिसावीं अशी योजना केली जाईल एलफिन्स्टन सर्कलाच्या सभोंवतालच्या इमारतीवर ही तरतऱ्हेचे दिवे लावले जातील बोरीबंदर, क्रफर्ड मार्केट, परळावरील एलफिन्स्टन कालेजाची नवी इमारत व परळावील गव्हरनर साहेबांचा बंगला, या ठिकाणीं ही तरतऱ्हेचे दिवे व तरतऱ्हेचीं चित्रें दृष्टीस पडतील. बाकी बरोबर सर्व लोक आप आपल्या शक्ती प्रमाणें दिवे लावणार आहेत, तो थाट निदान प्रतिवर्षाच्या दिपवाळी इतका तरी होईलच. नवीन सकडतारीची इमारत कोटासमोर डाककचेचे बाजूस तयार होत आहे तिच्या समोर मुख्य दारूकाम ज्या रात्रीं दिपोत्सव व्हावयाचा त्याच रात्रीं सुटेल. तरतऱ्हेचीं झाडें, चक्रें, नळे बाण इत्यादि प्रकार असून तीस फुटी उंचीचें एक देऊळ करून त्याजवर राणीचें मोठें चित्र ठेवणार. यांत खुबी अशी असते कीं देऊळ पेटविलें म्हणजे तें बरेंच वेळ जळत राहून ठिकठिकाणीं चित्र विचित्र रंग दृष्टीस पडतात व जीं चित्रें काढलेलीं असतात तीं न जळतां त्यांचे रंग मात्र दिसतात. ड्युक आव एडिंबरो हे सकडतारीच्या इमारतींत बसून दारूकाम पाहतील. ड्युकाच्या फंडास १०० किंवा १०० वर रुपये भरले आहेत त्यांस दर १०० रुपयांस एक टिकिट या मानानें टिकिटें दिलीं जातील; व टिकिटा खेरीज दुसरे कोणास सदर्हु इमारतींत बसावयास जागा मिळणार नाहीं. नेटिव लोकांच्या स्त्रियांस बसण्या करितां या इमारतींत वेगळी जागा केली जाईल.

---

## OPENING OF THE KHAMGAUM STATE RAILWAY.

Lord Mayo Governor General of India, Sir Salar jung, Mr. Saunders, Mr. Morris, and a party of European gentlemen arrived at Khamgaum at 3, 55 P.M. by a special train which left Akola 1½ P. M. and reached Jullum at about 3½ P. M.. Immediately after their arrival they proceeded to the terminus of the line, accompanied by a number of officers belonging to the Berar commission and the G. I. P. Railway and other Europeans and Natives who had come to Khamgaum by special trains in the morning and afternoon and performed the opening ceremony with loud cheers. Returning to the platform, which was thronged to the utmost, they received respects from all who were assembled. The Ressalla and the infantry, which were in attendance, presented arms and there seemed to be a very great activity and excitement among the vast concourse of people who were present on the occasion. The platform was decorated with greens and flags and covered with a white and red cloth lined with a wooden railing. The Viceroy, Sir Salar jung Mr. Saunders and Mr. Morris were conveyed by a four horsed carriage to the assistant Commissioners Kutchery and small CauseCourt followed by the Ressalla. The band was playing all the while. The kutcherey was decorated with greens, flags and articles of grains and Cotton together with Native and European small machines forming a sort of little Exhibition. Tents were pitched along side of the kutchery for the refreshment of the party. Lord Mayo and his distinguished retinue ascended the stair case which Commanded a fine view of the town of Khamgaum and also of the thousands of men who were assembled on the occasion. He there received from the members of the Khamgaum Municipality an address, expressive of the highest gratification and pleasure which that body, in common with the people generally felt by the honour the Viceroy and Governor General of India did to them by his kind presence and by the expectations of increased trade and prosperity which would result from the opening of the Jullum Railway and which would contribute greatly to the profit and happiness of the merchantile and agricultural classes.

Lord Mayo replied to the address in a short but suitable manner. Afterwards His Excellency accompanied by Sir Salar jung Mr. Saunders and the Chief Commissioner of the Central Provinces went to see the cotton market, the Factory of the Moffusil and Ginning Company and the town of Khangaum. The Resalla followed them. While they were in the town, all the officers were staying at the Kutchery.

In about an hour that is at 5 P. M. the Viceroy returned to the court house and Mr. Cornac shewed him all the different sorts of cotton and grains produced in the Berars and the Central Provinces together with specimens of the Native characks, cotton seeds produced in Government gardens at sheogaum and Oomerawattee and native cloth and English Piece goods.

At about 11 minutes past 5 P.M, the Viceroy and all the European gentlemen who were present on the occasion went and took their seats in the tent in which the luncheon was prepared about half an hour after. Mr. Saunders roseand spoke a few words in behalf of the administration of the Hyderabad Assigned Districts touching the opening of the new and first State line at Khamgaum, and thanking the Viceroy for his presence on the occasion and the various officers who had the charge and who had hand in the completion of the line-(Viz) Mr. Lyall Commissioner West Berar Mr. Cornac Cotton Commisioner of C. P. and Berars Mr. Carey Executive Engineer in charge of the State Railway and Mr. Izat executive Engineer West Berar.

The Viceroy then rose and gave a most elaborate speech embracing a variety of subjects in a clear and impressive manner. His fine oration carried with him the sympathy of the audienceand wasnow and then interrupted by their repeated cheers. He first expressed the highest gratification and pleasure he felt at khamgaum and Akola and thanked the European and Native gentlemen for the hospitality they shewed him and the zeal and loyalty shown by them in his reception. He dwelt at length on the material advantages which the opening of the 1st state Rail-

way in India would confer on the trade of this Province generally, and the agricultural industry particularly. Considering the short time of 10 months in which this line was prepared and the zeal and alacrity shewn by those who had the charge of its preparation the Government of India is convinced that Railway lines of this sort can better be prepared by Government Agency than by the Department of the G.I.P. Railway. His Excellency then remarked that it was not his intention to obliterate the old and natural lines of trade and to open new lines of traffic in the Country. Khamgaum State Railway will, he hoped, give an impetus to the cotton trade of this Province and contribute greatly to the increase of the wealth of the Berar cultivators. It would be presumptuous on his part he said to offer any lengthy suggestions regarding cotton to those who had an extensive acquaintance with the subject of the cotton cultivation with advantage. He said when he came to India, he was under the impression that the cotton of this country was not so good in quality as it ought to be and as would rival the American cotton, but that this impression of his had now been changed on a personal inspection and examination of the article during his late extensive journey in many parts of the country. There was a great demand of cotton in England and it was necessary and advisable to supply the same with an enough quantity of good or ordinary cotton. He alluded to the Irrigation works lately introduced into the country and the good effect which they would have on the cultivation of cotton. He then thanked the Minister of his Highness the Nizam for his presence on the occasion and said that he had set a very good example to all the Native princes of India by commencing to construct at his Highness Government a Railway from Hyderabad to Goolbarg. His Excellency then said that the paramount duty of the Govt of India and of every Englishman engaged in the administration of this empire was to develope the resources of this country by increased Railway and Telegraphic communications to conquer ignorance, prejudices, superstition and idleness which are the only present enemies of the people of India, to increase the quantity and improve the quality of cotton and to buy the most extent to bring home to the cultivators and other people of India generally wealth and happiness. He emphatically declared that the presence of Englishmen in India was for the good of its people as they owed much to them and as the support of many labourers working at the cotton mills of Manchester and Liverpool depends upon the cotton produce of India and many advantages have conferred on the English nation by the possesson of this country His Excellency observed that nature had done much to enrich this country so far as coals, iron, and other natural productions are concerned his Excellency praised various district officers engaged in the administration of this country for the zeal, activity and judgment with which they perform their manifold and important functions and said that it was easy for the Government of India to frame and issue orders in the various Departments but that it was difficult to execute them and that if any credit was due for the vast good which has been accomplished in this empire during a short time it was due rather to the District officers than to the Government of India.

In the whole world His Excellency said he did not think that such an able staff of excellent officers existed at this period as there was under the Government and that during our life time we had been attempting to accomplish in one generation results which other countries of the globe had taken many generations and centuries to accomplish. His Exeellency touched with regret on the late retrenching policy which was forced upon the Government of India by financial difficulties but expressed his intention of not reducing the expenditure which takes place for such as the cotton Department directly contribute to the prosperity of the Country.

The speech lasted for about 1½ hours and was exceedingly good and made the greatest impression upon the audience.

Sir Salar jung then rose. His Highness was received by the company with loud cheers which lasted for about a minute. His Excellency said that he was much obliged to the Viceroy for the high compliment paid to him, that after hearing His Excellency's able speech he was unable to speak so ably in English and that he would therefore speak a few words in Oordu. Sir Salar Jung said that the friendship between the Government of india and His highness the Nizam's Government was old, that the Government which he represented would do to the almost of its power what is good and right and would be as usual, loyal, and faithful to Her Majesty's Government and that he hoped that the Government would continue to treat the Nizams Government in the same manner as it had hitherto done.

Sir Salar jung regretted his inability to continue speaking any further as he was not aware of his having to speak this day and as he was not prepared for the same. This was followed by loud cheers About half an hour after, the luncheon was over and the Viceroy and his retinue left the refreshment room and came to the place where the special train was waiting The Viceroy left Khamgaum at 7½ P. M. nearly and went to Bhosawal on his way to Jubulpoor. Mr. Morris chief Commissioner of the Central Provinces accompained him. Mr. Saunders and Sir Salar jung remained behind and left Khamgaum by another train with all the European and Native Gentlemen, who were come for the occasion at about 9 P. M. This train reached Akola at 12 midinght nearly.

---

The following changes are made in the Deputy Commissioner's office at Bassim.

Mr. T. Venkata chellum 3rd clerk on Rs. 75 is promoted as Head clerk on Rs. 150 per mensem as a temporary measure vice Mr. H. J. Crowe reduced to the 3rd clerk. effected from 17th February 1870.

When Mr. Bapoojee Bheekajee who is proposed to be appointed as Head clerk, comes from Booldanah, Mr. T. Venkatachellum will go to Booldanah as 2nd clerk on Rs. 100 per mensem; to which he is proposed to be posted permanently.

---

# वऱ्हाड.

## खामगांवच्या समारंभांतील विशेष.

हिंदुस्थानचे गवरनर जनरल व व्हाइसराय लार्ड मेयो खामगावास आगगाडी चालू करण्याकरितां आले तेव्हां मे. हार्डन साहेब आमचे डिपुटी कमि. यांणीं तथील मुनसिपल कमिशनरांस लार्ड साहेबांपाशीं नेऊन भेटविलें व त्यांजकडून एक अड्रेस [मानपत्र] देवविला. त्यांतील तात्पर्य:—

आपण आमच्या या खामगांव शहरास आला याबद्दल आम्ही विशेष आदर प्रदर्शित करितों. हिंदुस्थानचा राज्यकारभार आपण पाहूं लागल्यापासून राष्ट्राची खरी संपत्ती व साधनें यांवर आपलें विशेष लक्ष असल्याचें दिसून येतें. तशीच आपल्या कर्तबगारीची अशी एक खुबी पाहिली कीं, तेणेंकरून पृथ्वीवरील वेगवेगळ्या राष्ट्रांचा व्यापार, दळण वळण, व परस्पर सहाय वाढत जाऊन त्यांचा एकोपा व्हावा. व महाराणी साहेबांची पश्चिम हिंदुस्थानांतील सर्व व्यापारी प्रजा याबद्दल आपले गुणानुवाद गात आहे. हिंदुस्थानच्या सर्व व्यापारांत कापुस हा एक अग्रेसर पदार्थ झालेला आहे. व खामगावास त्याची मोठी उलाढाल आहे व त्या आमच्या एथील कापसाच्या व्यापाराकडे आपण हिंदुस्थानांतील सर्व इतर ठिकाणांच्या आधीं लक्ष पुरविलें येणेंकरून यास फार मोठा लाभ झाला. म्हणून सरकारानें आगगाडयांचे रस्ते आपले खर्चानें बांधण्याचा नवीन ठराव केला तो अमलांत आणण्याचे कामीं पहिला रस्ता आपण आमचे खामगावचे वाटयास आणून दिला; रेलवेपासून हें शहर दूर असल्यानें एथील कापसाचा तगमोडून दुसरे ठिकाणी जाईल कीं काय अशी भीति होती ती आज नाहींशी झाली. आतां ईश्वर करो आणि अशीं महत्कृत्यें करण्यामध्यें आपला आणि सरकारचा जो उत्तम हेतु आहे तो सफळ होवो, आणि खामगावच्या कापसाच्या व्यापाराचें वैभव अधिकाधिक वाढो.

नामदार गवरनर जनरल साहेबानीं या अड्रेसावर उत्तर दिलें त्यातील तात्पर्य:—

ग्रहस्थहो, आज तुम्हीं स्वसंतोषानें व मायाळुपणानें समाधानकारक शब्दांनीं मला जो सन्मान दिला याबद्दल मी आपले आभार मानितों. हा लहानसा आगगाडीचा रस्ता सुरु करण्याचे समारंभाचे कार्यांत आपण मला घेतलेंत येणेंकरून मला अतिशय आल्हाद झाला. हिंदुस्थानांतील कापसाचे उद्योग सुलभ करण्यास व वाढविण्यास जितकें सरकारचें हातांत आहे तितकें तें करण्यास सिध्ध असल्याची याची इच्छा या योगानें प्रत्यक्ष उदाहरणांत दाखविण्याची मला संधी मिळाली हा एक मी लाभच समजतों. व्यापाराचें मुळचें वळण पडलेलीं ठिकाणें रेलवेच्या सोईकरितां वगैरे बदलणें चांगलें नाहीं. त्यापेक्षां त्या ठिकाणीं रेलवे नेण्याची व दळणवळण वाढविण्याची इत्यादि सोई करणें फार चांगलें असेंही माझें मत आहे. बाजार रेलवेच्या जागीं नेण्यापेक्षां रेलवे बाजारचे जागीं नेणें सुलभ आहे. आतां या आमच्या रेलवेच्या आरंभापासून सरकारचे योजलेले सर्व उद्देश सफल होवोत व यापासून खामगाव शहर आणि त्याचे लगत्याचा टापू एवढ्याचेंच कवळें हित होवो असें इच्छिण्यापेक्षा आम्ही इच्छितों कीं खामगावाभोवतालच्या लांबवर प्रांतांतील कृषिकर्मसंबंधी उद्योगाचेंही हित होवो.

---

वाशीम.—हल्लीं हवा गरम असून ज्वराची सां[illegible] निघाली आहे. या एक दोन दिवसांपासून आकाश ढगाच्या योगानें आच्छादित असतें. कालरोजीं थोडें पाणीही पडलें.

रा. रा. श्रीनिवास मोरेश्वर जुडीशाल शिरस्तेदार यांस पुसदचे तहशिलदारीचे कामावर सध्या आर्कटिंग नेमिलें आहे. व तूर्त त्यांचे जागेवर रा. हणमंतराव रामचंद्र कारकून यांस नेमिलें आहे.

येथील पोलीस स्टेशनांत नुकतेंच एके रविवारीं सायंकाळीं जानराव पाटील डोंगर किन्हीकर यास सरकारांतून एक मंदील इनाम देण्याकरितां येथील पोलीस इन्स्पेक्टर रा. कृष्णराव सखाराम यांनीं सभा भरविली होती. त्यावेळीं गावांतील सरकारी आणि दुसरे सभ्य लोक तसेच पुष्कळ पाटील, पटवारी, आणि चवकीदार लोकही आले होते. त्यांत अध्यक्ष स्थानीं मे. रामसेवक साहेब बसले होते. नंतर जानराव पाटील यांणें एका घरफोडी चोरीचे गुन्ह्यांतील माल आणि आरोपी धरण्याचे कामांत शिरपुर पोलिसास चांगली कुमक केली. आणि याचे मदतीने गुन्हा पत्यांत येऊन गुन्हेगारास शिक्षा झाली. याविषयीं पोलीस इन्स्पेक्टर यांनीं थोडक्यांत सांगितलें. नंतर अध्यक्षांनींही पाटील पटवारी लोकांस उत्तेजन येण्यासारखें भाषण करून मंदील जानराव यास दिला. पुढें पानसुपारी वाटून सभा विसर्जन झाली.

लिहिण्यास वाईट वाटतें कीं येथील प्रसिध्ध राजाचे घराण्यांतील कृष्णराव अप्पासाहेब राजे हे थोडे दिवस ज्वरानें आजारी पडून एकाएकीं मरण पावले. यांचे अकाली मरणानें येथील आबालवृध्दांस दुःख झालें आहे. यांचें वय सुमारें २८ वर्षांचें असून हे सर्वांस प्रिय होते.

येथें एक लहानशी लायब्ररी आहे तिची स्थिती असावी तशी नाहीं. कित्येक वर्गणीदार लोक आपली वर्गणी वेळेवर देत नाहींत याविषयीं तिचे कमीटींतील मेंबर लोकांनीं लक्ष द्यावें अशी शिफारस आहे. कारण हें काम सुधारणुकीचें आहे.

सालाबाद प्रमाणें अग्निनारायणाची स्वारी गावोगाव फिरून रयतेची नुकसानी करीत आहे.

---

रेसिडेंटसाहेब व दिवाणसाहेब यांच्या स्वाऱ्या जबलपुराकडे गेल्या त्यांचे पुढील मुक्काम समजले आहेत ते असे:—

| | | | |
|---|---|---|---|
| जबलपूर | ९ ता. | अलहाबाद | ११ |
| लखनौ | १२ ,, | दिल्ली | १७ |
| आग्रा | २० | काशी | २२ |
| कलकत्ता | २७ | मद्रास ता. ६ एप्रिल | |
| उटाकामंड | | | १२ |

व हैदराबादेस १७ वे तारखेस जाऊन पोंचतील.

मे० लायल साहेब कमिशनर यांची स्वारी जबलपुरास गेली नव्हती. मे० नैभार्ट. साहेब वगैरे मंडळी गेलेली परत आली.

खामगावास रेलवेचें नवीन स्टेशन झालें त्यावर नांदुऱ्याचे रा० विष्णु सखाराम यास नेमिलें. व नांदुऱ्यास मलकापुरचे रा. बाळाजी बापुजी यांस नेमिलें.

खामगावच्या रेलवेचा प्रसिध्द समारंभ झाला परंतु नित्याची गाडी अजून जाऊं येऊं लागली नाहीं. कांहीं व्यवस्था होत आहे ती झाल्यावर थोडेच दिवसांत गाडी जाऊं येऊं लागेल.

इलिचपुरास सुबोधप्रकाश नामें वर्तमानपत्र निघत असे तें तूर्त कांहीं अडचणीमुळें बंद झालें आहे असें कळतें.

स्टेशनावर बगीचा कोणी सुंदर करील त्यास बक्षिसें मिळतील असा रेलवे कंपनीनें ठराव केला होता त्याप्रमाणें नांदुऱ्याचे स्टेशनावर चांगला बगीचा केल्याबद्दल रा. विष्णु सखाराम यांस १०० रुपये बक्षिस मिळालें.

रा० रामचंद्र काशिनाथ लोंढे म्हणून तहशिलीकरितां एक गृहस्थ एथें उमेदवार आलेले आहेत. हे ठाणें जिल्ह्यांत मामलेदार होते.

ऊष्मा बराच होऊं लागला. व मधून मधून एखादे वेळेस पर्जन्य पडतो त्यामुळें काहली केव्हां केव्हा अधिक होते.

अकोटचे चीफ कानस्टेबल रा. बलदेव सिंह यांस ७० रुपये पगाराचे फर्स्ट क्लास चीफ केलें

असें ऐकण्यांत आलें आहे कीं मि० वोडहौस साहेब यांस हैदराबादेस सेकंड असिस्टंट रेसिडेंट नेमिलें त्यांचे खामगावचे जागेवर उमरावतीहून मे० अलेकझांडर साहेब व त्यांचे जागेवर मि० निकोलेट साहेब हे जाणार.

---

मागाहून आलेल्या जाहिराती.

## जाहिरनामा.

डिपुटि कमिशनरसाहेब जिल्हा अकोलें यांचे कचेरींतून जाहिरनामा सर्व लोकांस कळण्याकरितां प्रगट केला जातो कीं, तालुके बाळापूर येथील सन १८७०।७१ सालचे दारूअपकारिचे मक्त्याचा लिलांव खालीं लिहिल्याप्रमाणें तारीख २१ मार्च सन १८७० रोजीं अकोलें सदरष्टेशन कचेरींत हाण्यान्चा आहे.

६ गाववार भट्यांचा निरनिराळा लिलाव.
- १ मौजे खामगांव.
- १ कसबे वाडेगांव.
- १ कसबे शेगांव.
- १ मौजे बाबुळ खेडे उर्फ बाळापुर.
- १ मौजे लाखनवाडे बुद्रुक.
- १ मौजे पारस.

६

५२ राहिले बावन गावचे भट्यांचे च्यार गट करून अथवा निरनिराळे गांववार लिलांव होईल

५८ या प्रमाणें अठ्ठावन गावचे भट्यांचा लिलांव होणार आहे. लिलावांत बोलण्याची ज्याची उमेद असेल त्याणें नेमिले तारखेस दहा वाजतां हजर व्हावें.

याबद्दल ज्यास्त माहिती पाहिजे असल्यास खालीं सही करणार यांचे कचेरींत मिळेल तारिख ११ माहे मार्च सन १८७० इसवी. मुकाम अकोलें.

माधवराव हरी शिरस्तेदार.

(Signed) C. HORDERN.
officiating Deputy Commissioner Akola District.

---

## नोटिस.

तीर्थस्वरूप रा. धवाप्पा मुंजाळ यांच्या नोटिशीचें प्रत्युत्तर.

तुमचेकडून तारीख १२ च्या वर्तमानपत्रांत जें उत्तर आलें तें पावलें. त्याचें उलट उत्तर लागलीच द्यावें, परंतु पातुरची यात्रा व आमची प्रकृती अस्वस्थ यामुळें लागलीच देण्यांत आलें नाहीं. तुमच्या नोटिशींमध्यें वास्तविक जें उत्तर देण्याचें तें न देतां पाहिजे तसें कांहीं तरी उत्तर देवून वडिलांच्या नांवास कलंक लावण्याचा दोष देऊन आमची गैरचालही बाहेर प्रदर्शित केली. असो, वडिलच आहांत तेव्हां ती आम्हांस शिरसावंद्य केली पाहिजे, परंतु पुनः आम्ही आपणास जें नोटिशीअंतीं विच्यारतों त्याचा योग्य जबाब आपलेकडून मिळावा. जर योग्य न जबाब मिळेल तर पुढें फार वाईट परिणामास गोष्ट येणारी आहे. पंचमार्फत इमान करून जेव्हां वांटे होण्याचे ठरलें त्यांत असा ठराव पंचांनीं केला कीं, दोन भागांपैकीं माल एकांनी घ्यावा व रोख रक्कम एकांनीं घ्यावी. असें ठरेपर्यंत एकंदर सर्व जिनगीच्या किल्ल्या तुमच्या ताब्यांत होत्या. व वांटे होईंपर्यंत काहीं एक रक्कम उभयतांच्या विचाराखेरीज एक मेकांनीं घेऊं नये असेंही ठरलें होतें पुढें रुपये ४०००० आम्ही घ्यावे व माल तुम्ही घ्यावा असें ठरवून मालाच्या यादी तुम्ही पंचांच्या समक्ष सादर केल्या. व यांत बिलकूल तफावत नाहीं असें शपथेवर सांगितलें असून रोख शिलकेंत तुम्ही रुपये १०००० सांगितले ते पंचांच्या मार्फत शिलक तपासतां, १२००० रुपये शिलक निघाली तसेच वांटे होईपर्यंत माल एकमेकांचा घेउं नये असें असतां आमच्या पश्चात तुम्ही किती एकवेळां मालाचा कोठा उघडून माल आम्हास न विच्यारता नेतां असें बारीक रीतीनें आम्हांस जेव्हां समजलें तेव्हां आम्ही पाळत ठेऊन एके दिवशीं तुम्हास म्हणजे तुमचे गड्यास माल नेतानां धरून लागलीच सदर्हू कोठा बंदकरून मी माझे हातानें कुलूप लाऊन सर्व किल्या मी माझे ताब्यांत ठेविल्या. आणि जेव्हां सिलकेंत असें अंतर पडलें व माल न विच्यारतां नेऊं लागला तेव्हां ज्यास्त संशयास कारण होऊन मालही तपासावा असें वाटलें व मालापैकीं एक दोन जिनसा मोजून पहातांनी याद सिलक मालाची तुम्ही हजर केली तींत घेव १० खंडी व सेळज ३ खंडी हे लिहिले असून घेव २६॥।खंडी व सेळज ९॥ खंडी असे भरले यावरून एकंदर मालांत किती फरक असावा याचा वाचणारच विच्यार करतील. वडिलांचे नावास कलंक लावण्याचा पाय कोणी पुढें टाकिला हेंही सहज वाचणारांच्या लक्षांत येईल. केवळ पैशाच्या लोभानें इमान बुडवाल व सरकारी कायद्याच्या विरुद्ध हें वडिलांत कसें आवडलें असेल तें असो भाव्ही तर खचित वडिलांच्या भरवशावरच वांटे करण्यास खुषी जालों होतों परंतु सदरी लिहिल्या प्रत्येक गोष्टींत जेव्हा फरक दृष्टीस पडूं लागला तेव्हां अधिक आम्हांस ही लोभ सुटला. परंतु उपाय काय? समक्ष बरेंच वेळा विच्यारणें करून पंचांच्या मार्फतही सांगविलें, परंतु तिकडेस वडिलानीं लक्ष न पुरऊन केवळ पैशाच्या उजाडा फडेसच लक्ष पुराविलें होतें. असो, आतां खालीं लिहिल्या गोष्टीचे उतर मिळून सदरहु गोष्टी किती कायद्या विरुद्ध झाल्या, व यापासून काय परिणाम होईल हें पूर्णपणें लक्षांत आणून काय योग्य जबाब देणें असेल तो द्यावा.

सिलक वहित सुमारें १०००० असून तिऱ्हाइत हस्ते मोजतां सुमारें १२००० भरलीं तर असा खोटा जमाखर्च करण्याचें कारण काय;

मालाच्या यादींत घेव १० व सेळज ३ खंडी असतां ज्यास्ती रकमा कशा भरल्या? विचारल्या सिवाय मालास हात लाऊ नये असें असतां तुम्हीं पश्चात कोठा उघडून माल चोरून नेल्यासारखा नेला याचें कारण काय?

सदरील च्यार गोष्टीचा पाय फौजदारी कायद्याचे बुकांत तुम्ही आपले हाते अडकविला आहे व यास बहूत प्रमाणें आम्ही हजर करूं. तर तुम्हीं वास्तवीक रकमेचा निकाल आपसांत करावा हें वडिलास उत्तम आहे. माहींपेक्षां अडकलेला पाय निघण्यास फारच फार जड पडणार आहे हें खात्रीनें समजावें. व नोटिसीचा जबाब आठ दिवसाचे आंत विच्यारले मजकुराचा आला पाहिजे न आल्यास दोन्ही नोटिसीचा खर्च सुद्धा एकंदर दावा केला जाईल कळावें तारिख ८ माहे मार्च सन १८७० इसवी.

( सही ) विठोबा बालकृष्ण मुंजाळ

---

नोटिस खुशालराव गणेश देशपांडे वस्ती अकोट यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, अकोट येथील आमचे दुकानावर व्यापार संबंधी व सेतीचेंवगैरे काम पहाण्यास तुम्हास मुखत्यार नेमिलें होतें. पुढें त्या कामांत तुमची लबाडी आढळल्यावरून आम्ही तुमचे जागीं सालगुदस्तां दुसरा गुमास्ता नेमिला आहे, आणि तुमचे मुखत्यारपत्र रद्द केलें. सदरील गुमास्त्यास तुम्हीं दुकान संबंधी हिशेब व कागदपत्र न देतां मात्र आमच्या शेतीपैकीं कांहीं शेतें त्याचे स्वाधीन केलीं. आणि बाकिचीं शेतें देण्यास व दुकानचा व शेतीच्या सर्व उत्पन्नाचा हिशोब आम्हास समजाऊन देण्यास नोटिशीनें व आमचे गुमास्त्याचे द्वारें पुष्कळ वेळां तुम्हास कळविलें परंतु तुम्ही त्याबद्दल कांहींच तजवीज केली, नाहीं यास्तव या नोटिशीनें कळवितों कीं, आमच्या दुकामच्या वह्या आम्हास परत द्याव्या व तुमचे देणें देण्याबद्दल व सेतीचे उत्पन्नासंबंधी सर्व हिशेब आणि आमचे रिणकोच्या रुजुवाती होऊन त्यांचे दस्तऐवज वगैरे असतील ते सर्व ह्या नोटिशीचे तारखेपासून ८ दिवसांत उलगडा करावा न कराल तर तुमचे हरकतीनें लोकांकडील घेणें मुदतीबाहेर गेल्यास तें सुद्धां सर्व नुकसान तुमचेकडून भरून घेतलें जाईल.

२ आमचे गुमास्त्याचे स्वाधीन केलेल्या शेताची खातीं आपण वहिवाटदार असतांनाच आपले व आपले मुलाचे नांवें करून घेतली, तर हल्लीं त्या शेताचे खात्याचा राजिनामा देऊन तीं सर्व आमचे नांवें करून द्यावीं.

३ वर लिहिलेल्या शेता खेरीज आमची कांहीं शेतें तुमच्या ताब्यांत आहेत त्याच्या नांगरणीचा वगैरे सर्व खर्च आमचे दुकानातून झाला. वती शेतें चांगलीं तयार झाल्यावर सुपिकशीं दिसल्यांवर तीं आपण सोडलीं असें अम्हांस लबाडीनें सांगून आपले खाजगी उपयोगास लाविलीं. सदरील शेतावर तुमचा हक्क नसून त्याचे उत्पन्न आम्हांस न कळवितां आजपर्यंत तुम्हीं लबाडीनें घेतलें तर याबद्दलेंच नुकसान सदरील मुदतीचे आंत भरून द्यावें व सदरील शेताची खातीही आपले व आपले मुलाचे नांवें असलेलीं काढून आमचे नांवें करून देण्याची तजविज करावी.

---

येणें प्रमाणें कळविलें आहे तर पहिले कलमांत लिहिलेले मुदतीचे आंत या नोटिसीअन्वयें उलगडा करावा न कराल तर तुमचेवर कायद्याप्रमाणें या नोटिसीचे खर्चासुद्धां तजवीज केली जाईल, कळावें तारीख १२ माहे मार्च सन १८७० इ०

मुकाम अकोलें

( सही ) शामराव रामचंद्र गरुड

---

## वर्तमानसार.

ड्यूक आफ एडिंबरो यांची स्वारी मुंबईहून १८ वे तारखेस जलमार्गानें मद्रासेकडे जाण्यास निघल.

मुंबईच्या हायकोर्टास चीफ जस्टिस आनरबल वेस्राप साहेब प्युनी जज्ज हे नेमिले असें विलायतचे तार बातमी वरून समजतें.

पालीठाण्याचे संस्थानिकानीं राजपुत्राचे स्मरणार्थ आपले देशीं लोकोपयोगी कामें कराविण्या करितां इं० सरकाराकडे २५००० रुपये दिले.

मुंबईस राजपुत्राचे भेटिकरितां जे राजे व संस्थानीक आले आहेत ते.

तोफांचे मानकरी.

| | | |
|---|---|---|
| १. | गायकवाड सरकार. | २१ |
| २. | कोलापुरचे राजे. | १९ |
| ३. | कच्छचेराव. | १७ |
| ४. | मे. मिरअली मुराद. | १९ |
| ५. | लाहेजचे अधिकारी | १२ |
| ६. | जुनागडचे नबाब | ११ |
| ७. | ध्रांगदराचे राजे. | ११ |

इतर संस्थानिक.

जंजिऱ्याचे नबाब, जव्हारचेराजे, अक्कलकोटचेराजे, जमखंडी, सांगली, मिरज, कुरुंदवाड येथील पटवर्धन, वाडीचेसावंत, पंतप्रतिनिधी, पंतसचीव, जतकर डफळे, विंचूरकर, इत्यादि पुष्कळ मंडळी आली आहे.

महाराणी साहेबांचे वडील पुत्र प्रिन्स आफ वेलस यांची, एका स्त्रीच्या लग्न संबंधी हक्काचे फिर्यादीचे मुकदम्यांत जबानी झाली. तींत त्यानीं त्या स्त्रीशी दुष्कर्माचा अपराध केल्याचें अगदी नाकबूल केले पहा इंग्लिश राज्यरीती कशी आहे! इजमध्यें राजपुत्रावर देखील इतर रयते प्रमाणें कायद्याची सत्ता आहे. नाहीं तर आपलीं मराठी राज्यें जासुदास देखील खुना सारखे गुन्हे माफ!!

आपल्या महाराणी साहिबांचे चिरंजिव ड्यूक आफ एडिंबरो यांचे मुलाकतीकरितां कोल्हापुरचे छत्रपती महाराज, बडोद्याचे गाइकवाड सरकार, ध्रंगंड्राचे राजे, कच्छचे राजे, जुनागडचे नवाब, व लहान मोठे सरदार व मानकरी लोक मुंबईस जमले आहेत.

पंजाब येथील चिफ कोर्टांत मे. एल्, एस, कानिंगहाम एम. ए. बारिस्टर, यांस जज्ज नेमिले आहे असें कळतें.

जयपुरचे महाराज यांचे पाठिमागें सिंध येथील महाराज यांस सुप्रीम लेजिस्लेटीव कौन्सिलदार नेमणार असें समजतें.

गेल्या महिन्याचे पंचविसावे तारखेस गव्हरनर जनरल यांच्या कायदे कौन्सीलाची सभा भरली होती ते वेळीं आनरबल मि० स्टीफन, ला मेंमबर, यांनीं जे कायदे वहिवाटींत नाहिंत ते रद्द करण्या विषयींचे कायद्याचा मसुदा वाचला. याशिवाय जे कायदे व आक्ट प्रस्तुत वहिवाटींत आहेत यांचीं व्यवस्थशीर रचना करून, एकाच विषया संबंधी जे आक्ट आहेत तें एकत्र करून त्यांचा एक नवीन आक्ट करावा, याप्रमाणें करण्याचा विचार आहे असेंही त्यांनीं कळविलें.

ड्यूक आफ एडिंबरो यांचें नांव या देशांत चिरकाळ राहवें ह्मणून कोलापूरचे महाराजांनीं पन्नास हजार रुपये मुंबई सरकाराचे स्वाधिन केले आहेत. हा पैसा लोकोपयोगी कामाकडे लावावा असें महाराजांनीं गव्हरनर साहेबांस सुचविलें आहे, असें समजतें.

नागपुरास कपतान पेंबरटन ह्मणुन एक विद्वान माजिस्त्रेट आहेत. त्याजपुढें मी० बळवंतराव महाजन ह्मणुन प्रसिद्ध संभावित वकील आहेत ते एक खटला चालविण्यास गेले, त्यांत कांहीं विशेष बोलाचाली झाली. तेव्हां दीड शहाणे माजिस्त्रेट हे वकीलास अपशद्ब बोलले व याप्रमाणें करण्याची त्यांस खोडही आहे असें सेंट्रल इंडिया टैम्स पत्रावरून कळतें!

अमृतबजार पत्रिकाकर्ते सरकारास सुचवितात कीं लग्नपट्टी हा नवीन कर रयतेवर बसवावा आणि त्याबद्दल फक्त दोन रु. घ्यावे असें केलें असतां सुमारें पंचवीस लक्ष रु. उत्पन्न होतील.

डेकन हेरल्डवरून असें एक दुःख कारक वर्तमान कळतें कीं, पुणें जिल्ह्या पैकीं मावळ तालुक्यांतील वळवंडे ह्मणून गांव ता० २४ फेब्रुवारी रोजीं आग लागून जळालें. त्या गांवांतील सर्व घरें नाहींशीं झालीं. आग अकस्मात लागली.

लखनौ येथें ब्रिटिश इंडियन असोशिएशनच्या अयोध्येच्या शाखेनें राजपुत्र यांस एक उत्तम धाल तरवार बक्षीस दिली. तरवारिच्या मुठीवर रत्नखचित जडावाचें काम होतें. दोहींची मिळून किंमत दहा हजार रुपये होती असें टैम्सच्या बातमीदाराच्या लिहिण्यावरून समजतें.

## जाहिरखबरा.

### नोटिशीचा जबाब.

महानंदराम पुरणमल्ल साहु दुकान हळदें हैदराबाद, याजकडून मारवाडी जमनादास जैपदयाळ बिन्न धरमचंद राहणार मारवाड हल्लीं मुक्काम ऊमरावती यांस तुह्मी उमरावतीच्या सत्यप्रकाशात्रांत ता. १४ माहे फेब्रुवारी सन १८७० इसवी रोजीं आमच्या उमरावतीच्या दुकानाचें नांव लावून नोटिस छापविली आहे, तिची नक्कल तुह्मीं आमच्याकडे पाठविली; त्याजवरून हा जबाब देण्यांत येतो त्यांचीं कलमें:—

१. सदरहू तुमची नोटिस वाचून फारच आश्चिर्य वाटलें, कारण त्यांत तुह्मीं आमच्यावर खोटी तोहमत खडी केली आहे कीं, आह्मीं तुह्मांस कैद करून जुलुम जबरदस्तीनें दस्ताऐवज करून घेतले व दुसऱ्या अनेक खोट्या गोष्टी लिहिल्या आहेत त्या विनाकारण आमचें बदनाम करून नुकसान करण्याच्या इराद्यानें लिहिल्या आहेत, अशी आमची खात्री होते.

२ तुह्मीं उभयतां बंधूनीं आमच्या मुंबई व उमरावती येथील दुकानच्या कामांत अनेक लबाड्या केल्याचें वर्तमान आह्मांस कळल्यावरून आह्मीं चिरंजीव चिमणी रामजी यांस सदरहू दुकानाचा बंदोबस्त करून तुमचे हिशेब तयार करवून तुह्मांस इकडे मोसब्या करितां पाठवून द्यावे, असें सांगून इकडून रवाना केले. बरोबर चिरं रामलालजीही गेले त्यावेळीं तुह्मीं मुंबईच्या दुकानचें व तुमचे बंधु जैदयाळ उमरावतिच्या दुकानचें काम पहात होतेत.

३. चिरं चिमणी रामजी मुंबईस जाऊन कांहीं दिवसांनीं तुम्हांस उमरावतीस पुढें पाठविलें, कारण कीं, तुम्ही तिकडे जाऊन हिशेब व आकटाक तयार करावे, नंतर मागाहून चिमणी रामजी उमरावतीस गेले; परंतु तुमचे हिशेब आकटाक तयार नसल्यामुळें तुमच्या पूर्वीच त्यास इकडे परत यावें लागलें. त्याच्या हातून तुमची कोणतीही सफाई झाली नाहीं तुम्ही अमुक रीतीनें सफाई करून दिल्याविषयीं आपल्या नोटिशींत मजकूर लिहिला आहे तो खरा नाहीं.

४. चिरं चिमणी रामजी याजवळ तुम्ही कबूल केल्याप्रमाणें व इतर कांहीं कामाची सल्ला आमच्या बरोबर करणें होती, याजकरितां तुम्हास आम्ही हिकडे चिरं चिमणी रामजीस सांगून बोलाविलें व तुमच्याकडून मोसबा मागितला, परंतु तुम्हीं हिशेब तयार करून आणले नव्हते याकारणानें मोसबा घेण्यांत आला नाहीं, तसाच घेणे राहिला आहे व याबद्दल तुम्हीं आम्हास छापी कागदावर कबुलायत मांडून दिली आहे, परंतु त्याप्रमाणें तुमच्या हातून अद्याप वहिवाट झाली नाहीं. उमरावतीच्या दुकानची चीजबस्ती दस्ताऐवज वगैरे आमचे हल्लींचे मुनीम यांस सांभळून देण्याकारितां तुम्ही तिकडे जरूरीनें गेल्याप्रमाणें अद्यापि तसें केलें नाहीं.

५. तुमच्या लबाड्यांपैकीं आम्हास चार गोष्टी माहित झाल्या होत्या, त्यांविषयीं तुम्हांस समक्ष विचारल्यावरून तुम्हीं कबूल होऊन त्याबाबद हिशेब करून आम्हांस राजी करून रुपये ६१,००० एकसष्ट हजारावर फैसला केला. या रकमेचा हवाला हुसनसागर येथील असाम्याच्या पाडून दिल्याप्रमाणें आमच्या दुकानीं जमा खर्च झाला आहे. सदरहु हवाल्यापैकीं एक हवाला आमचे हुसनसागरचे दुकानाचा पडला आहे.

६ हसनसागराच्या छावणींत सदरहू हवाल्याबद्दल तुह्मीं राजीखुशीनें तमसूक सदरहू असाम्यास मांडून दिले आहेत ते त्याजकडे आहेत त्याविषयीं जबाब आम्हांस करण्याचें प्रयोजन नाहीं.

७ आमच्या हुसनसागराच्या दुकानाच्या तमसूक तुह्मीं मांडून दिला आहे तो त्या दुकानीं आहे. त्याशिवाय आमच्या नांवाची कबुलायत एक आह्मांस मोसबा देण्याविषयीं तुम्ही हुसनसागर येथें मांडून दिलेली आमचे ताब्यांत आहे. या दोन दस्ताऐवजाशिवाय दुसरा कोणताही दस्ताऐवज आह्मांस तुह्मी दिला नाही.

८ सदरहू दोन्हीं दस्ताऐवज तुह्मीं स्वहस्तोषें व राजीखुशीनें लिहून दिले आहेत परंतु तुमच्यावर सक्ति करून घेतले अशी तुमची तक्रार आहे त्यापेक्षां तुह्मी आठ दिवसांचे आंत हुसनसागर येथें येऊन त्या गोष्टीची आमच्यावर सरकारांत शाबिती करावी असें तुह्मी जर न कराल तर आमच्यावर खोटी तोहमत उभी केल्याबद्दल कायदेशीर तजवीज तुमच्यावर करणें जरूर पडेल.

९ तुमच्यापासून सदरीं लिहिल्याप्रमाणे मोसबा घेणें आहे तो तुम्हि आपले लेखी कबुलायती मुजब अंमल करून नंतर तिकडे परत लौकर येऊन समजावून देणें तसे केल्यावर ज्या रकमांची तक्रार पडेल त्याचा फैसल्ला होण्याकरितां सावकारी रीतीप्रमाणें इकडे पंच नेमून घेण्याविषयीं आम्ही फार राजी आहों. सारांश रीतीच्या गोष्टीस आमची मना नाहीं परंतु तुम्ही सदरील तुमच्या कबुलायतीप्रमाणें आमचे हल्लींचे उमरावतीचे मुनीम यांजकडे अंमल करून हिकडे मोसबा देण्याकरितां न याल व तुमच्या हयगई वगैरेच्या मुळें आमचें नुकसान होईल त्याचें जोखीम तुमच्यावर आहे आम्ही तुम्हांकडून असे प्रकारचें सर्व नुकसान व्याज शेकडा रुपये १ प्रमाणें भरून घेऊं हें तुम्हां उभयतां बंधूंस कळावें.

आम्ही तुम्हां उभयतांपैकीं कोणावरही जुलूम जबरदस्ती केली नाहीं असें असून जैदयाळ यांस तुम्ही जमनादास यांणें आमचे हिंगोलीचे दुकानांतून पळवून नेण्यासाठीं मनुष्यें व उंट पाठवून देऊन त्यांस पळविला व तो पळून गेला तुमचे पदरीं जर बेमानी नाहीं तर असें करण्याचें काय प्रयोजन होतें. राजीखुशीनें मोसबा देऊन नंतर पाहिजे तिकडे जाण्यास कोणती हरकत आहे.

**महानंदराम पुरणमल्ल.**

ता० २० माहे फेब्रुवारी १८७०

नोटिस—परमसुक नथमल मारवाडी दुकान देऊळगांव साकरशा यांस देण्यांत येते कीं तुम्ही तारीख २३ जानेवारी सन १८७० ची नोटिस वऱ्हाडसमाचारांत दिल्हेली मला पावली त्याचें उत्तर असें कीं. तुमचें मला बिलकूल देणें नाहीं. विनाकारण नोटिस दिल्यामुळें खर्च लागला. हा आठ दिवसांत दाखल करावा न केल्यास योग्य तजबिज केली जाईल कळावें तारीख १० माहे मार्च सन १८७० इसवी.

(सही) दावलबल्लद धनसींग कुंभार वस्ती चानी तालुकें बाळापूर निशाणी खुद हातची.

## जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें पुढील सालचीं ज० ग० छा० त छापलेलीं आम्हांकडे विक्री साठीं आलीं आहेत. किंमत दर प्रतीस ०३ आणे.

| किंमतीचे ठराव. | रु. | आ. |
| --- | --- | --- |
| वर्षाची आगाऊ देणारास… … | ६ | ० |
| साल अखेर … … … | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ … … | ३ | ८ |
| एक अंकास … … | | ५ |
| फुटकळ … … … | ० | ४ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च आगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०६

इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ०४

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there Subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

**सूचना**—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आह्मी अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें त्यास सवा दोन वर्षे होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंद करून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धा आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छा. प्र. केलें.

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL V AKOLA:—SATURDAY EVENING, MARCH 26 1870 NO. 13

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २६ माहे मार्च सन १८७० इ० अंक १३



## जाहिरात.

आम्हीं आपल्या प्रिय आश्रय दात्यांस विनय पूर्वक कळवितों कीं मागील तारिख १९ मार्च १८७० चा एक आठवड्याचा अंक शिमग्याचे सणा करितां कारखान्यांतील लोकांस सुटी दिली व दुसरें कांहीं जरूरीच्या कामाकरितां बंद ठेवणें जरूर पडलें यासविषयीं सर्व क्षमा करतील अशी आशा आहे.

ए० व० स


## अकोला प्रांतवऱ्हाड.

### येथील शाळांस उत्तेजन

सूर्योदय होण्याचे पूर्वी जसे उद्योगी लोक आपापलीं कर्तव्य कर्में करावयास आळस्यरहित होऊन तत्पर होतात; तसे आकोलें येथील किरकोळ सरकारी आणि इतर कारखान्याचे प्रत्येक हापिसर लोक नेक नामदार गव्हरनर जनरल व्हाईसराय लार्ड मेयो साहेब बहादूर आणि सर सालारजंग दिवाण साहेब निजाम सरकार व मेहरबान सांडर्स रासिडेन्ट साहेब बहादूर निजाम हैदराबाद यांचे येणें झाल्या मुळें आप आपलीं कामें करावयास विशेष तत्पर झाले.

विद्या खात्यांतील हायस्कूल, नार्मल स्कूल आणि इंग्लीश मराठी स्कूल येथील मास्तर लोकांनीं तत्रांतील विद्यार्थ्यांकडून मोठी हुशारी ठेविली होती. वरील साहेब बहादुरांच्या स्वाऱ्या खाचित विद्या खात्यांतील कामें पहावयास मोठ्या आवडीनें येतील अशी सर्वांस आशा होती व ती आशा सफल होण्याचा इतका योग घडून आला कीं, इंगलिश मराठी स्कूल आणि नार्मलस्कूल यांवरून त्यांच्या स्वाऱ्या १० हातांवरून दोन वार आल्या व गेल्या; परंतु डैरेक्टराच्या दुर्दैवामुळें किंवा मास्तरांच्या दुर्दैवामुळें म्हणा अथवा विद्यार्थ्यांच्या दुर्दैवामुळें म्हणा परंतु त्यांचें येणें शाळेंत झालें नाहीं; सर्व वऱ्हाडांत या तीन अकोल्याच्या शाळा पहाण्यासारख्या होत्या. इंग्लिश मराठी स्कुलाची इमारत १८००० रुपये खर्चून उत्तम प्रकारची पहाण्या माफक बांधली गेली आहे. परंतु तिच्या देखाव्यानें तरी सदरील साहेब बहादुरांची मनें आकर्षावयाचीं होतीं, पण तसेंही घडलें, नाहीं. बरें, मुक्काम थोडे दिवस होते असें म्हणावें तर रसिडेन्ट आणि दिवाण यांचे मुक्काम ८ दिवस होते, परंतु कोणत्यारा जरूरीय कामामुळें येण्यास फावलें नसेल अथवा अशी मसलत देण्यास कोण प्रधान पुढें झाला असेल हें कळत नाहीं. असो अशी जी निराशा होत आहे तों इतक्यांत तारीख ३ मार्च रोजीं प्रातःकाळचे आठ वाजण्याच्या सुमारास रा० रा० श्रीराम भिकाजी डी०ए०डे०ए०इ०आकोलें, रा० रा० वामन गणेश डे०ए०इ० एलीचपूर, रा० रा० बनाबारामचंद्र डे० ए० इ० वाशीम, आणि रा० रा० दामोदर पांडुरंग क्यूरेटर बूकडेपो अकोला यांच्या स्वाऱ्या इंग्लिश मराठी स्कूल, नार्मल स्कूल आणि हिंदुस्थानी नार्मल स्कूल पहाण्यास सदर इमारतीमध्यें आल्या प्रथम येण्या बरोबर शाळेंतील विद्यार्थी यांचा नम्रपणाचा देखावा, शिक्षक लोकांची आपआपलीं कामें चालविण्याची तत्परता, जागेची भव्यता, व तीची स्वस्थता व तिच्यांतील जागोजागीं लावलेले नकाशे वगैरे सामानाची व्यवस्था इत्यादि पाहून समाधान पावले ही सर्व व्यवस्था आरंभीं मे० लिडबेटर साहेब डायरेक्टर यांनीं पांच सहा दिवस पुर्वी सतत येऊन मोठ्या विच्यारानें केली होती, असो, वरील गृहस्थांचें देखणें झाल्यावर तेथेंच प्रथम हिंदुस्थानी नार्मल स्कूल पाहून मराठी नार्मल स्कूलांत आले तेथील विद्यार्थ्यांनीं नवीन येणाऱ्या त्रिवर्ग साहेब बहादुरांच्या मनोरंजनार्थ जींहस्त कौशल्यांची परोपरीचीं कामें (नाना प्रकारचे नकाशे, विलायतेंतील महाराणी व्हिक्टोरिया पावेतों झालेले राजे व राण्या, दिल्लीचे तक्तावर झालेले कुतुबुद्दीन या पासुन अकबर शहा पावेतों बादशाह, कलकत्ते येथें झालेले लार्ड मेयो पावेतों गव्हरनर जनरल आणि राणी साहेबांचा वंश यांचीं झाडें) मोठीं सुंदर पाहाण्या सारखीं केलीं होतीं. उत्तम प्रकारचीं बाळबोध अक्षरें कोणी सोनेरी शाईनें कोणी रुपेरी शाईनें कोणी चित्र विचित्र रंगानें लिहिलीं होतीं, कोणी नवीन कविता केल्या होत्या, कोणी छत्र बंध केले होते. असा हा सर्व एकदम देखावा वरील आलेल्या गृहस्थांनीं पाहून फार संतोष पावले. आणि म्हणाले कीं हीं सर्व हस्तकौशल्याचीं कर्में आमच्या समागमें दिलीं असतां आम्हीं नेऊन मे० डायरेक्टर साहेब बहादुरांस दाखवूं, म्हणजे ते यांचा विचार करून पुढें कांहीं योजना करतील. त्याप्रमाणें सर्व नकाशे वगैरे यांच्या म्हणण्या प्रमाणें रवाना केले, परंतु त्याच दिवशीं तीन वाजतां गव्हरनरजनरल साहेब बहादुरांची स्वारी येण्याची गडबड असल्या मुळें इकडे पाहून लक्ष पोहोंचविण्यास कोणासच बनलें नाहीं. मग पुनः ते सर्व नकाशे वगैरे शाळेंत परत मागविणें भाग पडलें. हें सर्व कृत्य होतांना विद्यार्थ्यांस आपल्या श्रमाचें सार्थक होण्याचा समय प्राप्त झाला असें भासलें; परंतु अखेर तो ही व्यर्थ झाला. तथापि इतकें मात्र त्यांचें समाधान झालें कीं यावरील गृहस्थांनीं पाहून बरें म्हटलें हीच आमची सार्थकता. इतका जो ते संतोष मानितात तों तारिख ५ मार्च शनवार रोजीं दुपारचे पांच वाजतां अकस्मांत रा० रा० आत्माराम भिकाजी एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर उमरावती, रा० रा० बापूजी रंगनाथ एकस्ट्रा अ० क० कारंजा व रा० रा० चिमणाजी राजाराम डे० ए० इ० उमरावती आणि रा० रा० भगवंत नरहर देशपांडे एलिचपूर यांच्या स्वाऱ्या सदर स्कूलें पहाण्याकरितां आल्या. इतक्यांत हिंदुस्थानी नार्मल स्कूल सुटलें गेलें मग त्यांच्या स्वाऱ्या मराठी नार्मल स्कूलांत येऊन दाखल झाल्या आणि तेथेंच सर्व नकाशे वगैरे सर्व हस्त कौशल्यांचीं कामें पाहूं लागले. मराठी नार्मल स्कूलांतील ३० विद्यार्थ्यांनीं आपापलीं कामें दाखवावयास जेव्हां उजवे आणि डावे साठ हात पुढें केले तेव्हां तो एक चमत्कारिक हुशारीचा देखावा मनोरम दिसू लागला. नंतर— त्यांनीं प्रत्येक विद्यार्थ्यांचीं कामें आपल्या डोळ्यां पुढें आणून मनः पूर्वक तपासलीं आणि कांहीं वांचून ही पाहिलीं. तेव्हां त्यांचीं मनें फार समाधान पावून आतां कांहीं यांची परीक्षा पहावी म्हणून इतिहास भूगोल आणि गणित हे हीं विषय विचारले त्यांनही सर्व विद्यार्थ्यांनीं यथास्थित उत्तरें दिलीं. नंतर ७।८ विद्यार्थ्यांनीं उत्तम प्रकारच्या सुस्वर कविता म्हणून दाखविल्या. अशी जी त्यांचीं मनें आनंद भरित होतांहेत इतक्यांत त्यांचीं मनें इंग्लिश मराठी स्कुलांतील विद्यार्थ्यांचीं कामें पाहाण्यास उत्सुक झालीं. तिकडील मास्तरांनीं ही विद्यार्थ्यां कडून मोडी बाळबोध पुस्तक्या व नकाशे वगैरे काढिले होते ते पाहून संतोष पावून त्याही मुलांची परीक्षा वाचन, भूगोल यामध्यें घेऊन त्यांनीं आपला आनंद प्रदर्शित करण्या करितां दोन्हीं स्कूलांतील हुशार विद्यार्थ्यांस १५ रुपयांचीं पुस्तकें इनाम वाटून दोन्हीं स्कुलांच्या मास्तर लोकांची शिक्षण पद्धतीची तारीफ करून विद्यार्थ्यांस कांहीं उत्तेजन येण्या सारखीं भाषणें रा० रा० भगवंत नरहर यांनीं करून अखेर जाते समयीं दोन्हीं स्कुलांतील व्हीजीटर बुकें वाचावून त्यांत सदरील मजकूर लिहून ठेविला.

येणें प्रमाणें रात्रीचे ७ वाजे पावेतों हा समारंभ होऊन विद्यार्थी, मास्तर आणि त्यांनीं केलेले श्रम यांची सार्थकता सदरील गृहस्थांनीं केल्याबद्दल मास्तरांनीं त्यांचे आभार दर्शवून सर्व मंडळी चालती झाली.

## गोरे लोकांचा पक्षपात.

इंग्रज सरकारचें राज्य होण्या पूर्वी जीं जीं राज्यें झालीं त्याजविषयीं आतां विचार करीत किंवा पूर्व इतिहास वाचीत बसलें तर त्यांची राज्य करण्याची शैली, कायदे कानू, रितिभाती, अगदीं निराळी होती, असें समजण्यांत येतें. पहिले राजे अविद्वान, दुर्बल, चैनी, व्यसनी, आळशी डामडौली, व हेकेखोर इतका गुणेकरून मोठे थाटानें आपले घमंडींत रहात, यामुळें आपले राज्यांत काय चाललें आहे, आपले पदरचे अधिकारी लोक नेमिलेलें काम बक्षशीर करितात किंवा कसें; रयतेस न्याय मिळतो किंवा अन्यायानें त्रासले आहेत याजविषयीं त्यानीं कधींही विचार केला नसेल व करितही नव्हते, मग मोठमोठ्या सुधारणुकेचीं कामें विद्यावृद्धी, यांजविषयीं तर शंकाच घेणें नको, अशा राजांपासून प्रजेस किती सुख होईल याजविषयीं सांगण्याची गरज नाहीं, बरें अधिकाऱ्यांनीं तरी या सर्व अनुराग्य गोष्टींकडे लक्ष पुरवावयाचें होतें, परंतु तसें कोणाचे मनात येतें आपली या हिंदूलोकांची अशी कांहीं चाल आहे कीं, जोंपर्यंत मिळत आहे तोंपर्यंत चैन नाच, तमाशे, बैठकी, ख्याली खुशाली याजमध्यें सर्व पैसा खर्च करून परिणामी अर्थातच डोळे उघडतात, मग विचार सुचतो कीं, आपण जोंपर्यंत चालत्या काळांत कांहीं उद्योग करून ठेविला असतां आणि वाईट कामांत पैसा खर्च केला नसता, तर आपल्यासही कधीं ही दशा प्राप्त झाली नसती, परंतु पाठिमागून तसे विचार होऊन काय उपयोग? राजा एकपट आळशी त्याजपेक्षां हे सवाई आळशी अशा अव्यवस्थेमुळें आपलें सर्व राज्य जाऊन दुसऱ्याचे दास होऊन नसणें प्राप्त झालें. आतां जसजसें ते नाचावयास सांगतील तसें त्यांजपुढें नाचून दाखवून कसा तरी उदरनिर्वाहा चालवावयाचा, मग एक ही वितभर खळी भरण्यास कोणी कसाही अपमान निर्भत्छना केली तरी ती निमुटपणें सोसून घेणें प्राप्त होतें. आपण च आतां आपले पहिले राज्यांस अगदीं वाईट म्हणतो आणि त्यांजविषयीं आपल्यास पश्चात्तापही होतो.

इंग्रजसरकारचा आम्मल या हिंदुस्थानावर झाल्यास सुमारें बरीच वर्षें झालीं व जेव्हां त्यांचे स्वाधीन हा धनाढ्य देश प्राप्त झाला तेव्हां त्यांनीं असा करार केला होता कीं, आम्ही निःपक्षपातानें राज्य करूं, प्रजेचें जें वाईट तें आमचें वाईट, अशा अनेक प्रकारचे तहनामे झाले असून त्यांजप्रमाणें कांहीं कांहीं गोष्टी अस्तित्वामध्येंही आणल्या. परंतु कांहीं गोष्टींविषयीं अजून बराच गवगवा राहिला आहे, तो जात्याभिमान. राजास सर्व लोक सारखेच मग तो नेटिव इंडोब्रिटन, किंवा युरोपीयन असो त्याजमध्यें तिळमात्रही फरक नसावा परंतु तसें नाहीं नेटिव लोकांपासून एखादा क्षुल्लक अपराध झाला कीं त्यांस तानडतोब शिक्षा. बरें नुसती शिक्षा देऊन तरी निमुटपणें बसतात काय? नाहीं त्यांस या सरकारांत चाकरी सुद्धां मिळण्याची मुष्कील अशीही नेटिवांची स्थिती? बरें, आतां इंग्लिश लोकांविषयीं विचार केला तर त्यांत सर्व मुभा, त्यांनी मनमानेल त्याप्रमाणें करावें. त्यांचे वेळेस सर्व न्याय धरयरां कांपून त्याजपासून दूर पळतात, अशाविषयीं शेकडों उदाहरणें वाचकांचे लक्षांत असतीलच बरें, हें युरोपियनांविषयीं झालें एवढ्यानेंच त्यांचा पक्षपात दिसून येत नाहीं तर मोठी अचंब्याची गोष्ट ही कीं पाटलोण बूट, व टोपी हीं राज्यवस्त्रें जो पेंगतो त्यानें कोणचा ही अपराध करो, घर फोडो, जुलूम जबरदस्ती करो, सरकारचे नोकरी मधें अ

सून सरकारी पैसा वापरो, आपले काम हयगईनें करो, असें सर्व प्रकारचे जरी अपराध त्यांजपासून झाले तरी वरीष्ट अधिकारी लोक डोळ्यावर कातडें ओढून व त्याची चौकशी न करुन स्वस्त बसतात ह्या पक्षपाती पणास काय म्हणावें? अशा बदल एक ताजें उदाहरण घडून आलें आहे तें लिहून सर्वांचे पुढें ठेवून खरें खोटें पणाविषयीं आमचे सुज्ञ वाचकांवरच न्याय करण्याचे सोंपवितों, व आम्ही आपल्या कर्तव्य कर्मा पासून हें लिहून मोकळे होतों.

आमचे या वऱ्हाडांत वाशिम जिल्ह्या आहे तेथें डेपुटी कमिशनर हापिसांतील हेड क्लार्क व मनीआर्डर एजंठ कोणी कौसाहेब आहेत या राजेश्रींनीं आपलें सर्व कामांत घोटाळा ठेविला होता, लोकल फंडाचे हिशोब बहूत दिवस तसेच रखडत टेविले होते. याप्रमाणेंच मनिआर्डचे हिशोबाविषयीं ही गवगवा बहूत ऐकत होतो व त्याप्रमाणें ते सर्व निदर्शनास ही आलें यानीं या कामांत ५०० रुपये वापारलें, हायदराबादेहून हिशोब तयार करुन लवकर पाठवावे अशी सक्तीची पत्रें गेलीं असून या बुवानीं आपण पाटलोणवाले आहो या घमेंडीमध्येंच राहून पत्राची कोणतेही रीतीनें परवा केली नाहीं. असें होताहोता सुमारें सहा महिने लोटले सरतेशेवटी हायदराबादेहून फारच सक्त पत्रें हिशोब तयार करुन पाठवावें व तुमचे हिशोबांत फार घोटाळा आहे, यामुळें मनीआर्डर आफिस बंद केलें आहे व ह्या कामाची कशी व्यवस्था, केली हें सर्व लिहून पाठवावे असा हा हुकूम लागतांच सर्वांचे डोळे तावडतोबड उघडले आणि हिशोब तपासाअंतीं वरील रकम शिलकेंत कमी आहे व ती मला ठाऊक नाहीं असें या हुशार एजंटसाहेबांनीं उत्तर दिलें व पुढें जी रक्कम कमी येते ती मी वापरली आहे व ती देण्यास मी खुशी आहे असें ही सांगितलें. या सांगण्यावरुन यांस आतां कोणची शिक्षा होते व खरावनी: पक्षपाती न्याय होईल असें सर्वांस वाटले परंतु साहेबपडले पाटलोणवाले यांस नें मिळेल अशी ही शंका आली व ती सरतेशेवटीं खरी झाली. तरी त्यांस येवढा हा गोंधळ केला म्हणून त्यांस त्यांचे निमे पगारांवर घालून त्यांस कायम केले. वाहावारे न्याय आणि वहावारे आमचे व निक्षपाती सरकार, वाचकहो तुम्हींच विच्यार करा कीं जर अशा या खटल्यांत एखादा नेटिव असतां तर केवढा बरें गोंधळ झाला असतां चाकरी तर मिळालीच नसती व त्यांस ठेविला ही नसतां परंतु त्यांस बिनभाड्याचे घराचा रस्ता धरणें प्राप्त पडता. यांवरुन इतकें स्पष्ट दिसतें कीं अशीही अघोर कृत्यें करण्यास पाटलोणवाल्यास सरकारच साह्य देतें कारण त्यांनीं वाईट केलेल्या कामाबदल त्यास दंड किंवा कोणचीही शिक्षा मिळत नाहीं यामुळें त्यांस फूस सापडून ते अधिकाधिकच चेकळतात. अशा या सरकारचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचें दुर्लक्षतेनें आमचे कृपाळू व न्याई सरकारास पक्षपाती पणाचा डाग लागून व खऱ्याखोटयाचा न्याय ही होत नाहीं. अतां या सदरील हकीगत ती वरुन दयाळू रसिडेंटसाहेबांस, व लोकप्रीय लायल साहेब कमिशनर यांस इतकेंच सुचवितों कीं त्यांनीं या सदरील खटल्याची बारीक रीतीनें चौकशी करुन यथायोग्य न्याय मिळेल अशी तजवीज करावी एवढेंच मागणें आहे.

---

## डयूक आफ् एडिंबरो यांचे मुंबइंत आगमन.

आपल्या प्रतापी महा राणीसाहेबांचे द्वितीय चिरंजीव डयूक आफ् एडिंबरो हे मुंबईस तारिख ११ मार्च रोजीं संध्याकाळीं जबलपूरमार्गानें आगगाडींतून मुंबईस जाऊन पोंचलें त्याजविषयींची माहिती व मुंबईचे लोकांनीं व राजेरजवाडे यांनीं जोराज्यनिष्टा दाखविली ती आमचे वाचकांस कळवावी या हेतुने सारांश रुपानें घेऊन सादर करतों दारुकाम कोठें कोठें कसें होणार यांजविषयीं मागें लीहीलें होतें त्याची आतां गरज नाहीं म्हणुन तो मजकूर लिहिला नाहीं.

राजपुत्र जबलपुराहून स्पेशीयल ट्रेनमधून मुंबईचे बोरीबंदर स्टेशनावर दाखल झाले, ते ज्या डब्यांत बसलेहोते तोडबा सोनेरी शाईचा होता त्यास बोरीबंदरस्टेशनांवर लार्डबिशप, मुंबईचे गवरनर, कौन्सलदार चीफ जस्टीस, कमांडर इन् चीफ आपलेपरीवारासह, नउज हायकोर्ट, करवीरचे छत्रपती महाराज, लंडेराव महाराज सेनाखासगेल कच्छचे राजे जुनागडचे नबाब, लहाज येथील सुलतान, जंजीऱ्याचे नबाब, ध्रगेंद्राचे राजे, अक्कलकोटचे राजे, प्रातीनिधी, सचीव, डफळे, सांगलीकर, जमखिंडीकर जव्हारचे राजे आदिकरुन सरदार लोकांच्या स्वाऱ्या जमल्या होत्या, डयूक साहिबांस गाडींतून उतरुन घेण्यास गवरनर साहेब व कोल्हापुरचे महाराज पुढें गेले होते. ते गाडीतून उतरुन सर्वांची सलामी घेतघेत राजपूत्रस्वारघोड्यांचे गाडींत जाऊन बसले तेवेळेस बेंड वाज्या व तोफाच्या सरबतीची एकच धादल झाली, राजपुत्रानें आपले डोक्याची टोपी काढून हातात घेतली होती, व ज्या गाडींत ते बसले होते ती गाडी परळाकडे मोटचा वेगानें कोणांस द्रिष्टीस पडली न पडली अशा थाटानें निघून गेली यामुळे सर्व गरीब गुरीब लोकांस वाईट वाटलें. व सर्व लोक असें म्हणूलागलेंकी. दोनप्रहरापांसून राज्यपुत्राची नजर भेट घेण्याकारितां आम्ही उभे असून त्यांची सार्थकता व नेत्र सुखही झालें नाहीं म्हणून सर्वांस तळमळत घरीं जाणें प्राप्तपडलें, बोरिबंदरापासून काळबादेवीचे रस्त्यानें फणसवाडीकडे वळण्यांस एक तासाहूनही कींबहुना ज्यास्त वेळ लागला. रात्रीं दहावाजतां सर्व सरदार लोकांस आमंत्रणें झाल्यावरुन रात्रीं १० वाजतां परळाच्या बगल्यांत सर्व सरदारांच्या भेटी नामाभिमानासह घेतल्यां थंडेंसें दरुकाम सुटलें.

मानपत्रें ता ०१२रोजीं सर्व सरदार लोकांचेवतीनें कोल्हापुरकर महाराज यांचेकडून उत्तम कागदावर सोनेरीशाईनें लिहिलेलें मानपत्र वांचून दाखविलें दुसरें मानपत्र मुंबईतील राहिवाशी यांणीं नेमलेल्या कमेटीच्या मार्फत दिलें. यामानपत्रावर सहाहजारावर सह्या आहेत हें मानपत्र ठेवण्यांस ४०० तोळे वजनाची रुप्याची नळी जिच्या अर्धभागावर ब्याकवे मुंबईचा कोट बंदरें यांचा नकाशा आहे, व अर्धभागांवर मुख्य मुख्य इमारतीचा नकाशा आहे. झाकणावरा मुंबईत जे निरनिराळ्या देशचें लोक रहातात त्यांच्या तसबीरी आहेत व बाकीचें भागावर सुंदर कोरीव काम केलेलें आहे. तिसरें मानपत्र मुंबईचे जास्टिस आफ्धी पीसयाणीं दिलें, चौथें आपल्या युनीवरसिटीकडून मिळालें पांचवे चेंम्बर्स आफकामर्सच्या सभेंकडून मीळालें या सर्वा मानपत्रांची उत्तरें मागांहून मिळतील म्हणून डयूकसाहेबांनीं सांगितलें.

सोमवारीं डयुक साहेब कांहीं राजे वगैरे लोकांच्या बंगल्यांत भेटी घेतल्या नंतर सुमारें तीन वाजतां राजपुत्र गायकवाड सरकारच्या भेटीस त्यांच्या तंबूत गेले.

तेथें माहाराजानीं त्यांस मौल्यवान उत्तम प्रकाराच्या मोत्यानीं गुंफलेला एक डगला, व एक रत्नजडीत कटयार अशी बक्षीस दिली. डयूक साहेब तंबूत आले व गेले ते व्हां चांदिच्या तोफातून सरबती झाली. व पुढें राजपुत्र कच्छचे महाराज यांजकडे गेलें तेथें ही माहाराजानीं एक गेंड्याच्या कातड्याची वर सुंदर काम केलेली ढाल, फरशी, गुप्ती, तरवार व कांहीं कच्छीं हत्यारें नजर दिलीं मग कोल्हापुरचे माहाराज छत्रपती खेंपुरचे मिर अली मुराद यांच्या रहाण्याच्या ठिकाणीं भेटीस गेले होत. व त्याच रात्रीं सरकारी बंगल्यात मेजवानीही झाली.

मंगळवारीं डयूक साहेब गोदी पाहाण्यांस गेले होते व तिसरे प्रहरीं गवरनर साहेब व दुसऱ्या कांहीं मंडळी सहवर्तमान घारापुरीस कोरीव लेणी पहावयास गेले होत बरोबर डाक्टर भाऊदाजी हेही मुद्दाम बोलाऊन नेले होत त्यानीं तेथील सर्व माहिती सांगितली नंतर डयूक साहेब जहाज व बंदरें याजवर केलेली शोभा पहात परत आले.

बुधवारीं राजपुत्र गवरनर साहेब व आणखीं कांहीं गृहस्थ समागमें खंडाळे येथें बोरघाट पाहाण्यास गेले तेथें सरजेंमसेटजी जीजीभाई यांनीं सामोरे जाऊन आपले बंगल्यावर आणून त्यांस मेजवानीं दिली व घाटांतील काम पाहून सायंकाळींसात वाजतां स्वारी मुंबईस परत गेली.

गुरुवारीं प्रातःकाळीं नवीन एलफिन्स्टन कालेज पाहावयास गेले होतें. तेथें राजपुत्रावर विद्यार्थ्यांनीं व प्रोफेसरांनीं कविता निरनीराळ्या भाषांत केलेल्या कांहीं वाचून आपला संतोष प्रदर्शी केला. नंतर भायखळ्यावरील बांबे एजुकेशनल सोसायटीच्या ताब्यांतील शाळां तेथून मेडिकल कालेज व त्यांतील दवाखानें नंतर सेंटमेरीज इन्स्टीठयुशन पाहावयास गेले होते, त्याच दिवशीं तिसऱ्या प्रहरा नंतर फ्रामजीकावसजीज इनास्टेटयुशनमधील मुलींस बक्षीसें वाटण्याचा समारंभ चालला होता तो पाहाण्यास व अशा अनेक गोष्टी पाहाण्यांत व सेलरहामचा दगड बसवून व तेथून विकटोरिया गार्डन्स मधें फुलाचें प्रर्दशन पाहाण्यास गेले होते.

शुक्रवारीं सरासरी स्वस्थ विश्रांतींत राजपुत्रानी घालवीला तरी जुनागडचे नवाब यानीं ते दिवशीं त्यांची गाठ घेतली याच रात्रौ वालके श्वराच्या सरकारी बंगल्यांत खाना खावयास गेले होते.

शनिवारीं सकाळीं बंदरावर राजे रजवाडे संस्थानिक सरदार व दुसरे गृहस्थ व युरोपियन कामगार लोक हे मोठे डामडौलानें राजपुत्रास पोंचविण्यास गेले होते. सुमारें नऊवाजतां राजपुत्र ढाका या नावाच्या आगबोटित बसून मद्रासेस जाण्या करितां बेपुरास सर्व लोकांचा निरोप घेऊन चालते झाले.

---

## वऱ्हाड.

बाळापूर तारिख १२ मार्च रोजी तिसरे प्रहरीं पर्जन्य पडावयास लागला व मौजे पारस येथें चिंचचे झाडावर विज पडली तेंव्हां त्या झाडाखालीं दोन मनुष्ये आश्रया खालीं बसलेले होते त्या पैकीं एक जण तर तत्काल मरण पावला व एक जण मुका झाला व तो जिवंत आहे असें आमचे बातमी दारांकडून कळतें व तारिख २२ माहे मार्च रोजीं गाराचा पाऊस पडला, कायहा अनर्थ?

येथील तहसील दार रा. रा. हणमंत खंडेराव यांस पेनशन मिळाले असें समजतें.

उमरावती येथील स्मालकाज कोर्टचे जडज मे० मेंजीज साहेब यांनीं १९ माहिन्याची रजा घेतली असें कळतें.

दारव्हें येथील तहसीलदार रा० रा० अंबादास संतो यांस दारव्हे तालुक्यातील ५०० रुपये पर्यंतचे दिवाणी मोकदमें तपासण्याचा अधीकार मिळाला.

इलिचपुर—येथील वकील लोकांच्या नेमणुका खालीं लिहिल्याप्रमाणें झाल्या डे. क. यांचे कोर्टांत गोपाळ अनदराव व केशव गणेश वैद्य, स्मालकाज कोर्टांत दिनकर नारायण, श्रीपत महादेव, व झामराव, ए. अ. कोर्टांत मोरो सखाराम व आत्माराम गणेश जु. ए. अ. कोर्टांत मार्तंडराव नारायण राव विष्णुपंतबाबा व बळवंतराव दर्यापुर तहशिलदारांकडे गणेश शिवराम इतक्या वकीलांस आफिसर लोकानी मर्जीनरुप घेतलें परंतु लिहिण्यास दु:ख वाटतें कीं नारायण मल्हार वकील यांस कोणींच पत्करलें नाहीं यांतील इंगीत काय असेल तें असो हे वकील हुशार आहेत असें म्हणतात.

मोर्तीजापुर तालुक्याचे आसपास चोरटे लोकाचा वराच ऊपद्रव झाला आहे कुरुम येथील तुळसीराम मारवाडी यांचे घरी एक हाजार रुपयांची चोरी झाली हें जर खरें आहे तर पोलिसानी इकडे नजर पुरवावी.

---

### अकोला.

येथील मराठी व इंग्रजी शाळेंत ता. १६ मार्च १८७० रोजीं मुलांस बुकेंव मुलींस पर्दके व खण वाटण्याचा समारंभ झाला. त्यावेळीं मे. हारडर्न साहेब डेपुटी कमिशनर अध्यक्षस्थानीं बसलें होते. या समारंभास डाक्टर सिंक्लेअर शाळाखात्याच डायरेक्टर व हायस्कूल येथील हेडमास्तर मे. स्कार्जी साहेब मे. वहिमनजी जामासजी, अ. क. व कांहीं वकील लोक असून शाळा खात्याकडील मे. श्रीराम भिकाजी नठार डे. ए. इ. पांडूरंग दामोदर, व दुसरे हायस्कुलांतील मास्तर हजर होते. मुलांस बक्षिसें वांटण्याचे अगोदर डायरेक्टर साहेबांनीं इंग्रजींत सुरस व्याख्यान दिलें. नंतर मुलीं

स हैदराबाद येथील रेसिडेंट सांडर्स साहेब यांचे पत्नीकडून प्रत्येक मुलीचे शाळेस चांगलें पहिले मुलीस पदकें आलीं ली हीं मे. हारडर्न साहेबांनीं आपलें हातानें मुलींचे गळ्यांत बांधलें व मुलांस बक्षिसें दिलीं. नंतर डेप्युटी कमिशनर साहेबांनीं थोडेसें इंग्रजींत व्याख्यान देऊन यावर्षी कांपीटिटीव परिक्षा येथें करावी व त्याजविशईंसर्व व्यवस्थेबदल मे० बहिमनजी जामासजी अ. व. हे सर्व गतवर्षी ज्या प्रमाणें उमरावतीचे लांकांनीं सोय केली होती त्याप्रमाणेंच येथें करतील असें सुचविलें नंतर सभा विसर्जन झाली. आतां आम्ही सर्व वकील शेट सावकार व दुसरे सभ्य गृहस्थांस असें सुचवितो कीं त्यांनीं उमरावतीचे लोकांसारखी कांपिटेटीव परिक्षेस साह्य करून आपला उदार आश्रय देण्यांस मागें पुढें पाहू नयें.

अकाली पर्जन्य—या आठवड्यांत दोन तीन दिवस पाऊस पडल्यामुळें एक दिवस येथील नदीस पावसाळ्याप्रमाणें पाणी आलें होतें. गावांत तापाची सांत बरीच आहे.

येथील हिंदुस्थांनी व मराठी नार्मल स्कूलची परिक्षा तारीख १४ पासून तारीख २६ पर्यंत पहिलें स्टांडरची झाली मराटीकडील सोळा उमेदवारा पैकी सात व हिंदुस्थांनीं कडील ११ उमेदवारा पैकीं नऊ उमेदवार पास झालें.

मे. डेबीससाहेब असिस्टंट कमिशनर ह्यांची तबेत आजारी असल्यामुळें रजा मागितली आहे व ती रजा पासहोऊन आली म्हणजे विलायेंतस जाणार असे कळते.

मे० डायरेक्टर साहेब आपल्या सर्व हपीसासह चीखलदऱ्यास गले. आंहव तेथें तिन महीनें मुकाम होईल असें म्हणतात.

मे० श्रीराम भीकाजी डे० ए० इ० हे जळगांवांकडे शाळा पहाववास गेले आहेत

## वर्तमानसार.

लार्ड नेपिअर आफ मागडाला हे विलायतेस गेल्या नंतर एथील कम्यांडर इनूचीफचें काम मेजर जनरल गार्डन हे पहात होते. ह्या गृहस्थानीं सदरील अधिकार चालवित असतां, आपणास एथील कायदे कौन्सिलांत बसूं द्यावे म्हणून मुंबई सरकाराशीं पत्रोपत्रीं थोडा अधिक प्रसंग केला. ह्या अविचारी वर्तणुकीबदल सदरील गृहस्थांस चेक द्यावा असें हिंदुस्थान सरकारास सेक्रेटरी आफ स्टेट यांजकडून लिहून आलें आहे, असें समजतें.

आम्हास लिहिण्यास फार आनंद होतो कीं मुंबई येथील मिस्तर सोराबजी शापुरजी बंगाली यानीं मि. बालाजी पांडूरंग यांचे स्वाधीन पुनर्विवाहाचे बदल ६०० रुपये दीले असें टा. इ. वरून कळतें.

पुणें येथें शनवार पेठेंत पुनर्विवाहाचे सशास्त्र अशास्त्रतेबदलचा निर्णयाविषयींचा वाद विवाद श्रीगुरु शंकराचार्य यांचे पुढें मागील शनवारपासून सुरु आहे या वाद विवादाकरीतां, काशी, नासिक, वाई, इंदूर, ग्वालेर, बडोदे, कोल्हापुर, सातारा आणि दुसऱ्या कांहीं जिल्ह्यांतून शास्त्री लोक आले अहेत आणि याजबदलचा निर्णय एकअठवड्यांत होईल. पुनर्विवाहाचे पुढारी व पुरःकर्ते वे. स. विष्णु परशराम शास्त्री पंडीतही येथें अले आहेत असें पूना अबझरवरवरूनकळतें ईश्वरवरो आणि पुनर्विवाहाचे पक्षास जय येऊन गरीब व अनाथ विधवांस त्यांचे दुःखापासून सोडवो.

जो कोणी चाहाची लावणी व तो तयार कसा करावा याविषयीं लहानसा ग्रंथ लिहील त्यास पांचशे रुपयें बक्षीस देण्याचा या देशांतील शेतकी फूल व फळ व झाडें सुधारण्याकारितां जी सभा स्थापन झाली आहे तिचा उद्देश आहे.

पुनर्विवाहाच्या संबधानें श्री जगद्गुरु शंकराचार्य यांची स्वारी पुण्यास आली आहे. सशास्त्र अशास्त्रतेचा वाद होण्यावदल पुनः नोटिसा देण्याचा व पत्रें लिहिण्याच्या क्रमास पूर्वीप्रमाणें सुरुवात झाली आहे. रा. रा. विठोबा अण्णा दफतरदार हे पुण्यास असतां नोटिसांचा व पत्रांचा यथास्थित भडिमार झाला. पुनःही तसाच होण्याचा रंग दिसत आहे. या पत्रांचा व नोटिसांचा वाद संपून खऱ्या वादास आरंभ होईल तेव्हां खरें.

महार मागांचीं मुलें सरकारी शाळेंत घेण्यास कांहीं हरकत नाहीं असा नागपूर इलाख्याच्या सरकारी मुख्य अधिकाऱ्यांनीं ठराव केल्यावरून चंद्रपूरचे डेपुटि कमिशनर मेजर लूसी स्मिथ यांणीं हा ठराव अमलांत आणून ता. १४ मिनहू रोजीं चंद्रपूर एथील हैस्कुलांत माहारांचीं १० मुलें घेतल्याबदल एथील टैम्स पत्रास एकां बातमीदारानें लिहिलें आहे.

डयूक बोरीबंदरावर उतरले त्या वेळच्या देखाव्याच्या व सर सालरजंग यांच्या तजबिरी एथील भायखळा स्टूडियोमध्यें मिळतात. जांस पाहिजे असतील त्यांणीं घ्याव्या. ने. ओ

फ्रान्स देशच्या राजपुत्रा पैकीं दोन राजपुत्रांत द्वंद्वयुद्ध झालें पैकीं एक मारला गेला अशी तारायंत्र द्वारें बातमी आली आहे. द्वंद्व युद्धाची चाल युरोपखंडांत पुरातन काळापासून चालत आली आहे ती अजूनही मोडत नाहीं.

खपुरथळ्याचे महाराज विलायतेस जाण्याकरितां तारीख १९ मिनहूस निघून मुंबईस आले अहेत बराबर मथुरादास दिवाण, आणखी सुमारें वीस आसामी नेणार आहेत त्यांचे तेथें रहाणें सुमारें सहामहीने होइल.

डयूक साहेबाचे बेपूर येथें गमनः— काल सकाळी आठ वाजतां डयूक साहेबांची स्वारी ओठराम आगबोटींतून बेपूर येथें मद्रासेस जाण्याकरितां निघून गेली. सर्व बेत आले त्या वेळेसारखाच ठेविला होता.

वर्णतवि स्मारक कृत्य- कच्छ येथील महाराव यानीं प्रिन्स आल्फ्रेड यांच्या आगमनाचें चिरकाल स्मरण आपल्या इलाख्यांतील लोकांस राहवें या हेतूनें आपल्या मुलखांत एक हायस्कूल त्या राजपुत्राच्या नावानें स्थापन करण्याकारितां दीडलक्ष रुपये देण्याचा बेत केला आहे असें नेटिव ओपिनियन वरून कळतें.

एडिंबरोचे डयूक यांच्या आगमनाच्या स्मरणार्थ कांहीं स्मारक कृत्य करण्याच्या उद्देशानें ध्रांगद्राचे राजसाहेब यानीं तीस हजार रुपये सरकारच्या स्वाधीन केले असें कळतें.

स्तुत्य देणगी मुंबईयेथें हायस्कुलाकारितां चांगलें व मोठें शालागृह नवतें ही मोठी अडचण होती ती दूर करून एडिंबरोचे डयूक यांच्या आगमनाचेंही स्मरण निरंतर राहेंव एतदर्थ शालागृह बांधण्याकारितां आन. ए. डी. सासून, सी. एस. ऐ. यांनीं एकलक्ष रु० देण्याचें कबूल केलें असें समजतें. अशा सार्वजनिक उपयोगाच्या देणगीस कोण अयोग्य ह्मणेल.? इ० प्र०

विजया पट्टणा पासून कांहीं अंतरावर सत्रांव फेब्रुआरीस रात्री आकाशांतून सतेज असा एक तारा पडला. तो पडत असतांना चोहीकडेस पुष्कळ अंतरावर चकचकाट व उजेड झाला होता. ह्या धोंड्याची परिक्षाकरून पहातां त्यांत धातू भेसळ आहे असें दृष्टोत्पत्तीस आलें, त्याचें वजन पांच शेर भरलें

## जाहिरखबरा.

नोटिस—दामा वल्लद रामा चोखरे व बिठोबा वल्लद भगवान सुतार वस्ती पिंपळगाव तालुके जळगांव यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मौजे मालेगांव तालुके जळगाव येथील शेत बाबई वाले यांचे खासगत आमचे नावें असून यांत तुम्हांस तिसरे हिशाची भागी व देऊन दोन हिशाची भागीन आम्ही आपणाकडे ठेविली. याजबदल तुमचा आमचा करार असा कीं. उभयतां मिळून जमिनीची मेहेनत करावी आणि आपआपले हिशाची लागवड करावी व सरकारी पैसा देत जावा त्याप्रमाणें तुम्ही आजपर्यंत वहिवाट करित आलां असान साल गुदस्त सरकत दार याचे रुजुवातीचे वेळेस म्हणजे पेरणीचे अगोदर पासून आपले दोन हिसे आहेत म्हणून विनाकारण तंटा करून सालमजकुरीं तुम्हीं पेरण्यास बक्तशीर नआल्यामुळें सदरहू शेतापैकीं दोन तीन फणीची जमीन तुमचे हरकती मुळें पडीत पडली हें नुकसान झालें व जी जमीन आम्हीं पेरली त्याची लागवड खर्च ही तुम्हीं दिला नाहीं सर्व लागवड खर्च मी लाविला व सरकारी पैसा ही मी दिला. जंगलांत उभें पीक असतां तें काढणीचे वेळेस तुम्हांस चौघाचे मारफत व मी स्वतः बोलावीत असता आला नाहीं याजमुळें उभें पीक खराब होऊं लागलें सबब ज्वारीचा माल काढून तिऱ्हाइताचे वाढग्यांत सालीना आजपर्यंत तसाच पडला आहे.

सरकारी पैसा देण्यासाठीं कापूस तिऱ्हाइताचे मार्फत वेचून आणून पिंपळगांवचे शटयाकडून मोजून पाहातां अडीज खंडी भरला तो कापूस खुशालनाईक यांस साठ रुपये खंडी प्रमाणें विकून सरकारचा सारा ११६ रुपये देउन बाकी रुपये ३९ अमानत ठेऊन हल्लीं या नोटिसीनें तुम्हांस कळवितों कीं. आजपासून आठ दिवसांचेआंत तुमचे हिश्शाचा सरकारी सारा व तुमचे हिश्शाचे मेहनती बदल लागवडीचा हिशेब आम्हीं केला आहे तो पाहून आमची बाकी तुम्हाकडे निघती ती सर्व चुकऊन देऊन ज्वारीचे मालाची मळणी करणें राहिली आहे ती करण्यास येऊन आपले हिश्शाची ज्वारी यईल ती घेऊन जावी जर याप्रमाणें येऊन नकाराल तर राहिलेले ज्वारीचा माल मळणी करून ज्वारी निघेल तिचा आकार पाहून झालेले खर्चाचे रुपये तुमचे हिशाचे आमचे तुम्हांकडे निघाल्यास या नोटिसीचे तारख पासून एकंदर होईल त्या प्रमाणें पुढें तुम्हांवर फिर्याद केली जाईल कळावें तारीख २२ मार्च सन १८७० इसवी.

( सही ) बाबू वल्लद भगवान जाधव राहाणार पिंपळ गाव.

नाटिस—नारायण एकाबा नाइक शेलगांवकर रहाणार मौजे पिंपळगांव तालुके जळगांव यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं मौजे मजकुरीं तुमचे व आमचे निमेनिमेंच पातीचें दुकान होतें. अलिकडे तुमचें आमचें न बनल्यामुळें तंटा होऊन दुकानचे विभाग होण्यास देवकरण मुलतानचंद व खुशाल दामोदर मद्धे यांजवर उभयतांही राजी होऊन एक रुपयाचे कागदावर कबुली दस्तऐवज लिहून दिले, त्याप्रमाणें सदर्हू दुकानचे व्यापारापैकीं व्याजगण आम्ही घेऊन खडी तुम्हीं घेतला. इतकेंच मात्र झालें याशिवाय अफू व कलाली व वनचराईचा मक्ता पतीचे दुकानांतून घेतला त्याजबदल हिशेब मागत असतां तुम्ही देत नाहीं. व त्यांतील नफाबदल आमचा विभागही देत नाहीं व पिंपळगावचें शेत उभयतांचे पातींत सालमजकुरीं होतें त्यांतील ज्वारी निमेची आम्हांस न देतां तुम्ही आपले घरीं ठेविली व हरभरे एक खंडी दुकानपैकीं जळगांवास विकावयास तुम्हीं घेऊन गेला त्याजबदल विकरा आला तो आम्हास दिला नाहीं गाड्यांची किंमत रुपये २० ठरली पैकीं आमचे हिश्शाचे रुपये १० व दुकानांतील गाड्या २ पैकीं एक गाडी व गाड्याचें चाक आमचें हिश्शाचें असून सर्व डाग तुम्ही एकट्यानें आपलें घरीं ठेऊन घेतले. व ज्वारी चें पेंव जुनें च्यार वर्षांचे ज्वारी खंडी ७ पैकीं ३॥ खंडी ज्वारी आमचे हिश्शाची असून सर्व ज्वारी तुम्ही आपलें घरीं ठेविली व म्हैस एक तीचे २९ रुपये किंमती पैकीं १२॥ रुपये आमचे असून म्हैस तुम्हीं आपले घरीं ठेविली व अफू दोन शेर मुरलीधरचे दुकानची तुम्ही नेली त्याजबदल किंमत आम्ही भरूनदिली तीतुम्हांकडे येणें व आमचा खासगत चांदीचे तोड्याचा जोड वजन भार ९० चा आमचे दुकानांतून आपले कुटुंबास घालण्याकारितां मारुती नाईक गुमास्ते यानीं मागून नेला तो दिला नाहीं या सर्व प्रकारचा निकाल करण्यास ज्या पंचावर तुम्ही राजी झाला त्याचे ही ऐकत नाहीं सबब तुम्हास कळावितों कीं, या नोटिशीचे तारखेपासून ८ दिवसांचे आंत निकाल करून द्यावा तुमचे आम्हांकडे राहिलेलीं कापसांचीं ओझीं ९ द्यावीं तसें न केल्यास तुमचेवर फिर्याद करून या नोटिशीचे खर्चासुद्धां तुमचेपासून भरून घेण्यांत येईल तारिख २२ मार्च सन १८७० इसवी.

( सही ) दाजी लक्षुमण भंगी रहाणार पिंपळगांव काले.

### जाहिरखबर.

मी टिकाराम वल्लद नरशींगजी नाटे मलगांवकर सर्व लोकांस जाहिर करितों कीं, आमची चुलती गोंडीबाई नवरे राघोजी नांट इचा आमचा वाद लागला आहे व तिचे ताब्यांत आमचें घर वगैरे सदरील नोटिशींत लिहिले प्रमाणें जिनगी आहे. ती सरकारांतून कायदेशीर निकाल होई पर्यंत कोणी खरेदी, गाहण, बक्षीस वगैरे कोणते हीं प्रकारें घेऊं नये. घेतल्यास त्याचें नुकसान होईल. कळावें तारीख १२ मार्च १८७० इसवी.

[ सही ] टिकाराम याचे हातची रेघ.

## नोटिस.

ता॰ गेंदीबाई नवरे राघोजी नाटे वस्ती मौजे जळगाव तालुके अकोट इजला ठिकाराम वल्लद नागोजी नाठ यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हीं कोणा लोकांचे नादीं लागून आमचे वारशाचे हक्कास खलेल घालित आहा हें चांगलें नाहीं असें तुम्हांस समजावें व दिवाण दरबार चे नादीं लागुन खर्चाचे पेचांत न यावें व आपले घराण्याची उपहासता चौघांत नकरावी म्हणून ही नोटिस लिहून तुम्हांस कळवितों तर इजवर चांगलें लक्ष द्यावें.

आम्ही तुमचे पुतणे आहो, तुमची सवत लक्ष्मी बाई व जाऊ आनंदाई अशा तुम्हीं तिघी निपुत्रिक आहा. व मी तुमचा कायदेशीर वारस आहे हें सर्वत्र मशहूर आहे व त्या नात्यानें आमच्या दुसऱ्या दोन्ही चुलत्या चालत असतां तुम्हीं भलता विच्यार करीत आहा. तुमचा मुलगा नामें लक्ष्मण हा अधलें घरचा असल्यामुळें त्यांचा आमचे घराण्याशी अर्था अर्थीं कांहीं संबंध नाहीं हें तुम्हास कळत नाहीं याचें आश्चर्य वाटतें असो आलीकडे आम्हीं कांहीं कामा निमित्त दोन वर्षे दुसऱ्यादोघी चुलत्यासहित अकोटास आलो तेव्हां मागें तुम्हीं एकट्याच घरीं होता. नंतर आम्हीं परत गावीं आलों व शेतांतील कापसाचा हिशोब व विक्रीचापैसा वगैरे मागूंलागलो तेव्हां तुम्हीं दंडलीच्या गोष्टी सांगूलागला कीं मी तुम्हांस कांहीं देणार नाहीं मी आपले जिनगानीची मुखत्यार आहे. त्यास तुम्हांस कळवितों कीं तुम्ही अन्नवस्त्राचे मात्र धनी आहा. व तें आम्हीं तुम्हांस देण्यास कबूल आहो. स्थावर जंगम मालावर तुमची कांहीं मात्र सत्ता नाहीं सबब लोकांचे नादीं लागून वाकडा विच्यार करूं नये. तुम्हीं शेतांतून कापूस व ज्वारी काढून नेली, मिरच्या विकून १०० रुपये घेतले आहेत, आफू आम्हास काढूं देत नाहीं, बैल, म्हैस वगैरे जनावरें व घर आमचें तुम्हीं अडकवून बसला आहा हें नीट नाहीं. ही नोटिस पोचल्यापासून आठ दिवसांचे आंत सदरीं लिहिलेला आमचा सर्व माल व रोख रुपये आमचे कडे आणून द्यावे व दुसऱ्या दोघी चुलत्या प्रमाणें तुम्हीं आमचे घरांत येऊन राहवे. तुमची घरांत राहण्याची खुशी नसेल तर मर्जीस येईल तसें करावे आणि आमची जिनगी रोखीसुध्दां सदरी लिहिल्याप्रमाणें आठ दिवसांत आमचे हवालीं करावी. न केल्यास तुम्हांवर कायद्याप्रमाणें फिर्याद केली जाईल व तिचा आणि या नोटिशीचा सर्व खर्च भरून घेतला जाईल कळावें ता॰ १२ माहे मार्च सन १८७० इसवी.

[सही] निशाणीची रेघ ठिकाराम याचे हातची.

नोटिस पांडुरंग वल्लद भिवापाटील मौजे मुगनाबाद तालुके मलकापूर यांस खालीं सहीकरणार यांजकडून कळविण्यात येतें कीं तुमचें आमचें भागीदारी मध्यें जमीन असून त्यांतील माल, कपाशी, ज्वारी, गहू, व चणे हा माल तयार असून मळणी करण्यास तुम्ही येत नाहीं व तुम्ही न आल्यानें मालाचा नाश व नुकसानी होत आहे तर ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत येऊन सर्व उलगडा करावा न केल्यास सरकार तर्फे फिर्याद करून या नोटिशीचे व मालाचे नुकसानी जी होईल ती भरून घेण्यात येईल कळावें तारीख २४ माहे मार्च सन १८७० इसवी.

(सही) सखाराम पाटील रहाणार मुगनाबाद.

नोटिस नाऱ्हा घाशी मोमारी रहाणार हिवरखेड तालुके अडगांव यांस जानकी कोम नाऱ्ह इजकडून देण्यांत येते कीं. मी तुझी लग्नाची बायको असून आज सहा वर्षे पावेतो मजला तुनांदवित नाहींस व मी राहण्यास खुशी असून तू दुसरे लग्न करीत आहेस तर ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत मजला घरांत नांदवावें व न नांदवशील तर माझे पोटापाण्याची सोय करावी व आजपर्यंतचा जो माझे आईबापाचा सहा वर्षे पर्यंत खर्च झाला आहे तो द्यावा न दिल्यास मजला फिर्याद करणें जरूर पडेल व या नोटिशीचा जबाब मजला सोडचिठ्ठी न देणें विषयीं याचा उत्तर न आल्यास सरकार तर्फे फिर्याद करून या नोटिशीचे खर्चासुध्दां तजवीज करणें प्राप्त पडेल कळावें तारीख २३ मार्च सन १८७०

(सही) जानकू कोम नाऱ्ह रहाणार जळगाव जामूद इच्या हातची निशाणी. बांगडी

नोटिस —मल्हारी वल्लद नारायण ढवळे मौजे मोहोदरी परगणें अमडापूर तालुके चिखली यांस नोटिस देण्यांत येते कीं तुम्ही देउळगाव साकरशा येथील श्रीराम शाळीग्राम या दुकानचे देणें रुपये २४ मुद्दल चोपित शिवाय दुहोत्रा प्रमाणें व्याज देणें आहात तरी हे रुपये नोटिस पोचल्यापासून आठ दिवसाचे आंत द्यावे नाहींतर दिवाणी कोर्ट मार्फत वसूल करून घेण्यांत येईल कळावें तारीख २५ माहे मार्च सन १८७० इसवी.

[सही] श्रीराम शाळीराम दस्तुर हिरालालजी.

नोटिस— मुंगसाजी वल्लद कुकाजी बोकाटे रहाणार पांढरी परगणें सुर्जी अंजनगांव तालुके दर्यापुर. यांस खालीं सही करणारी कडून नोटिस देण्यांत येते कीं; तुझ जवळ माझें लग्न झाल्यास सुमारें १९ वर्षे झालीं असून कांहीं दिवस मला तुम्हीं आपले घरीं नांदविलें असून अजमासें नऊवर्षे झालीं तुम्हीं मला माझे माहेरीं पोंचविलें त्या दिवसांपासून तुम्हांस नेण्या विषयीं माझे आई व बंधू यांणीं पुष्कळ वेळां निरोप पाठविले असतां आजपर्यंत नेण्यास आला नाहीं. आज नऊ वर्षे पर्यंत माझे आई व बंधू यांनीं पालन पोषण केलें त्यास खर्च अजमासे पांचशें रुपये झाला. मी माहेरी असल्या कारणानें संसारसुखाचे दिवस फुकट चालले आहेत. करितां या नोटिशीनें तुम्हांस कळविण्यांत येतें कीं ही नोटिस पावल्या दिवसापासून पंधरा दिवसांत तुम्हीं मला घरीं घेऊन जावें आणि मला चांगले रीतीनें वागवावें मी राहाण्यास खुषी आहे जर तुम्हीं पंधरा दिवसाचे आंत मला घेऊन न जाल तर दुसरा नवरा जन चाली प्रमाणें करीन मग माझेवर तुमचा लग्न संबंधीं हक्क कोणता ही प्रकारें नाहीं. कारण आज नऊ वर्षे पर्यंत मीं तुमची वाट पाहिली आणि दुःखाचे दिवस घालविले आतां माझानीं दिवस कंठवत नहीत हें तुम्हांस नोटिशीनें कळवीत आहे, अर्थेही असून मुदतीप्रमाणें तजवीज न कराल तर मी जबाबदारीत बिलकूल राहिली नाहीं कळावें तारिख ६ मार्च सन १८७० इसवी मुक्काम हल्लीं परतवाडा.

(सही) गोविंदी मुंगसाजी रहाणार कुंभारगांव ता. दर्यापूर हिचे हातची निशाणी बांगडी.

नोटिस—सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं जानजी वल्लद अमराजी ढगे रहाणार चिचोली तालुके बाळापूर यांजकडे आमचे भागिदारीबद्दल शेताचा नंबर व घर आहे तें आमचें असून त्याजबद्दल आम्हीं त्याजवर फिर्याद केली आहे, तर ह्या शेताचा नंबर किंवा घर कोणीं खरेदी, बक्षिस, गहाण किंवा हरएक प्रकारची त्याजबद्दल देवघेव करूंनये केल्यास तो आमचा फैसल झाल्याशिवाय लागू होणार नाहीं. कळावें तारीख २४ माहे मार्च सन १८७०

[सही] बाहादुर वल्लद गोविंदरावजी पाटील कसब शेगांव.

नोटिस भाऊ दाजी भंगी राहणार मौजे पिंपळगाव यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हीं आमचे पासून विभक्त असोन साल गुदस्त तुम्हांस आम्ही देवकरण मुलतानचंद यांचे दुकानांतून कर्ज रुपये १२९ देवविले त्याचे व्याज सुद्धां रुपये १९० अजमासें होतात व आम्हीं आपले दुकानांतून दिल्हे ते रुपये १०८ व्याज सुद्धां अजमासें रुपये १३८ होतात एकूण एकंदर रुपये १८८ खोते बाकी बद्दल तुम्हांकडे येणें असोन मागत असतां तुम्ही देत नाहीं व आमची बहिण सून अहिल्या इचे जवळून तुम्हीं आपले बायकोस लग्नास जाण्याचे आहे अशी भुलथाप देऊन आमचे मागे तीचे पासून सोन्याच्या पाटल्या जोड एक वजन तोळे ४ व सरी सोन्याची वजनें तोळे ६ व तोड्याचा जोड चांदीचा भार १००चा येणेप्रमाणें दागीनें गफलतीनें मागून नेले ते परत मागितले असतां देऊं म्हणोन सांगून अद्याप आणून देत नाहीं. यास्तव या नोटिशीचे तारखे पासून आठ दिवसाचे आंत सर्व उलगडा करावा न केल्यास या नोटिशीचे खर्चासुद्धां तुम्हांवर फिर्याद केली जाईल कळावें तारिख २२ माहे मार्च सन १८७० इसवी मुकाम अकोलें.

(सही) दाजी लक्षुमण भंगी राहाणार पिंपळगाव काळे.

## जाहिरनामा.

सर्वत्र लोकांस कळावें कीं, तारीख १ माहे एप्रिल सन १८७० इसवी रोजीं सकाळचे सात वाजतां अकोला येथील डिपुटी कमिशनर साहेब बहादूर यांचे कचेरी समोर खालीं लिहिलेले मालाचा लिलांव होणार आहे.

| | |
|---|---|
| लांकडी पलंग. | आरसे. |
| लोखंडी पलंग. | आंघोळीचे पीप. |
| गाद्या. | रिकाम्या पेट्या. |
| उशा. | चहादाणी. |
| ब्लांकेटस तांबड्या व पांढऱ्या. | खुर्च्या. |
| | तोंडधुण्याचें मेज. |
| चिकाचे पडदे. | तोंडधुण्याचें तस्त. |
| तक्याचे गलेफ. | मेणबत्तीचीं घरें व |
| टेबलें शिसवीचीं. | ग्लास. |

येणेंप्रमाणें पुष्कळ माल आहे. तारीख २४ माहे मार्च सन १८७०

H. Nicholetts.

## जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें पुढील सालचीं ज॰ ग॰ छा॰ त छापलेलीं आम्हांकडे विक्री साठीं आलीं आहेत. किंमत दर प्रतीस ०३ आणे.


| किमतीचे ठराव. | रु. | आ. |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास ... ... | ६ | ० |
| साल अखेर ... ... ... | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ... ... | ३ | ८ |
| एक अंकास ... ... | | ५ |
| फुटकळ ... ... ... | ० | १ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ६१२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो १ रु. ४ आणे व सालअखेर १ रु॰ ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून १ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सारून नवें साल चालू होते तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत... ... ... १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०१

इंग्रिश नोटिसीचे दर ओळीस ०४

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there Subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*


सूचना—नोटिसा व इतर मजकूर छापवयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व॰ स॰

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अकटोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें त्यास सवा दोन वर्षे होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दरशेकडा अर्धे आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल.ता॰ १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छा. प. केलें.